CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## भारत-पाकिस्तानमध्ये आज फायनलचा थरार

मुंबई : इमर्जिंग एशिया कप २०२३ ची फायनल पारंपारिक प्रतिस्पर्धी भारत अ आणि पाकिस्तान अ संघामध्ये होणार आहे. भारताने बांगलादेशचा पराभव करत फायनलमध्ये प्रवेश केला तर पाकिस्तानने श्रीलंका संघाविरोधात विजय मिळवत फायनल गाठले. साखळी फेरीतील सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला होता.



आता पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये लढत होणार आहे. भारत ए आणि पाकिस्तान ए यांच्यातील इमर्जिंग एशिया कपमधील फायनल सामना श्रीलंका येथील कोलंबोच्या मैदानात होणार आहे. रविवारी दुपारी दोन वाजता सामन्याला सुरुवात होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कोणता संघ बाजी मारणार? याकडे क्रीडा चाहत्यांचे लक्ष लागलेय. यामध्ये कोण बाजी मारत आशिया चषकावर नाव कोरतेय, हे पाहणं औत्सुक्याचे आहे. इमर्जिंग एशिया कप स्पर्धेत भारताने निर्वादित वर्चस्व मिळवले आहे. आतापर्यंत भारताला एकाही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला नाही. बांगलादेशचा पराभव करत भारताने फायनलमध्ये धडक मारली आहे. साई सुदर्शन, यश धुल आणि अभिषेक शर्मा यांनी फलंदाजी मोठे योगदान दिलेय. हर्षित राणा आणि राजवर्धन हंगरकेकर, निशांत सिंधू आणि मानव सुतार यांनी भेदक मारा केला. युएई आणि नेपाळ दोन्ही संघांना भारतीय गोलंदाजांनी ऑलआऊट केले होते. पाकिस्तान विरोधातही साखळी सामन्यात भारतीय संघाने बाजी मारली होती. आता फायनलमध्ये भारतीय संघ कशी कामगिरी करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेय.

www.surajyadigital.com | रविवार, दि. २३ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# मुख्यमंत्र्यांनी टाकली 'गुगली', वाचाळविरांची 'दांडी' उडाली

## अचानक मोदींच्या भेटीला; मजबूत 'मांड' दाखवून दिली

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या वर्षभरापासून धक्कादायक घडामोडींचे सत्र सुरु आहे. शनिवारी देखील अघटितच घडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अचानक दिल्लीला गेले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याने महायुतीतील भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.राष्ट्रीय लोकशाही आघाडीची अर्थात एनडीएची बैठक झाल्यानंतर अवघ्या चारच दिवसात शिंदेंनी पुन्हा दिल्ली का गाठावी? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. शिंदे यांनी कौटुंबिक कारण पुढे केले असले तरी यामागे राजकीय गौडबंगाल असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी झाल्यापासून अजितदादा हेच आता पुढचे मुख्यमंत्री असणार,असे वादळ महाराष्ट्रात उठले आहे. त्या चर्चेला चाप लावण्यासाठी आणि सत्तेत आपलाच पाया भक्कम असल्याचे दाखवून देण्यासाठी शिंदेंनी मोदी यांची भेट घेवून धक्कातंत्र अवलंबल्याची चर्चा आहे.**



**दिल्ली कनेक्शन भक्कम :** शिंदे यांनी गुवाहाटीमध्ये समर्थक आमदारांशी बोलताना आपल्याला महाशक्तीची साथ असल्याचे म्हटले होते. त्याचा प्रत्यय त्यांच्या मुख्यमंत्रिपदी झालेल्या निवडीतून दिसून आला होता. महाराष्ट्रातील सत्ताबदलात शिंदे यांचा थेट संपर्क मोदी आणि अमित शाह यांच्यासोबत असल्याचे वारंवार स्पष्ट झाले आहे. एनडीएच्या बैठकीनंतर चार दिवसात एकनाथ शिंदे यांनी सहकुटुंब मोदी यांची भेट घेतली. मोदी यांनी देखील यावेळी त्यांना वेळ दिल्याने पुन्हा एकदा शिंदे त्यांचे दिल्लीचे कनेक्शन भक्कम असल्याचे दाखवण्यात यशस्वी ठरल्याचे मानले जात आहे.

**मोठा मित्र आपणच.. :** राज्य सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सहभागी झाल्याने महायुती सरकारला बळ मिळालेले आहे. सरकारचे पाठबळ वाढलेले आहे. देशातील २६ विरोधी पक्षांनी इंडिया नावाची आघाडी जाहीर केली. विरोधी पक्ष एकवटत असल्याचे पाहून नरेंद्र मोदी आणि भाजपने देखील एनडीएला मजबूत करण्याचे जाहीर करत जुन्या मित्रांना साद घालायला सुरुवात केली. सध्या भाजपनंतर एनडीएतील सर्वात मोठा पक्ष एकनाथ शिंदे यांचा आहे. शिंदे यांच्या सोबत लोकसभेचे १३ खासदार आहेत. त्यामुळे भाजपला एनडीए म्हणून पुढे जायचे असल्याचे शिंदे यांचा सन्मान कायम ठेवावा लागणार आहे.मोदींनी देखील हाच हेतू डोळ्यापुढे ठेवलेला असावा, असे राजकीय जाणकारांना वाटते.

**दुखावून कसे चालेल? :** लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीनं भाजपकडून राजकीय डावपेच आखले जात असताना आणि एनडीएची नव्यानं बांधणी होत असताना १३ खासदारांचं आणि सेनेच्या ४० आमदारांचं पाठबळ असणाऱ्या एकनाथ शिंदे यांना भाजप दुखावण्याचे धाडस करण्याची शक्यता धुसर होते.एनडीच्या बैठकीत मोदींनी शिंदे यांना स्वतःच्या रांगेत स्थान दिले होते.आजच्या बैठकीत मोदींनी आपल्या सोफ्यावर शिंदे स्थान दिले व महाराष्ट्राची स्थिती जाणून घेतली.या प्रसंगातून शिंदे यांनी आपली राजकीय मांड पक्की केल्याचे मानले जात आहे.

शिंदे यांनी आपल्या कुटुंबासह मोदी यांची भेट घेतली. एनडीएची बैठक झाल्यानंतर अवघ्या चार दिवसांमध्ये पुन्हा एकदा शिंदे हे मोदींना भेटण्यासाठी राजधानीला रवाना झाले. अजित पवार आणि राष्ट्रवादीचे ८ नेते शिंदे यांच्या मंत्रिमंडळात सहभागी झाले. तेव्हापासून राजकीय घडामोडींना वेग आला आहे. त्या पार्श्वभूमीवर शिंदे यांची ही भेट महत्त्वाची मानली जाते.

मोदी यांनी शिंदे कुटुंबाच्या भेटीत मुख्यमंत्र्यांचे वडील संभाजीराव शिंदे यांना जवळच्या खुर्चीवर बसण्याचा मान दिला. शिंदे कुटुंबाच्या चार पिढ्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. आपल्या कुटुंबाची मोदींना भेटण्याची इच्छा होती.त्यासाठीच आपण दिल्लीला आल्याचे शिंदे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. यावेळी मोदी यांनी श्रीकांत शिंदे यांच्या मुलाशी देखील संवाद साधताना दिसून आले. माझ्या वडिलांना पंतप्रधान मोदींना भेटण्याचा आनंद झाल्याचेही शिंदे म्हणाले. अजित पवारासंह एका गटाने सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेत त्यांनी मंत्रिपदे स्वीकारल्यानंतर काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण, खासदार संजय राऊत यांनी अजित पवार यांना भाजपकडून मुख्यमंत्री केले जाऊ शकते असे दावे करण्यात आले होते. दुसरीकडे विधानपरिषद आमदार अमोल मिटकरी यांनी देखील अजित पवार यांचा लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी होईल, असे ट्विट केले. गेल्या महिनाभरापासून मुख्यमंत्री बदलाचा चर्चा सुरू असताना शिंदे आणि मोदी यांची भेट कौटुंबिक असली तरी ती राजकीयदृष्ट्या महत्त्वाची म्हटली जात आहे.

---

### इथे एक होती इर्शाळवाडी

## मृतांची संख्या २२ वर; ४८ तासांनंतरही १०५ जण बेपत्ता

सुराज्य/अलिबाग

**मृतांचा आकडा तीन आकडी होण्याची भीती**

आतापर्यंत २६ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहे, तर १०० पेक्षा जास्त लोकांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. परंतु हा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. हा आकडा दुर्देवाने तीन आकडी असू शकतो, अशी भीती भाजपा नेते व मंत्री गिरीश महाजन यांनी वर्तवली.



इर्शाळवाडी दरड दुर्घटनेतील मृतांची संख्या शुक्रवारी २२ वर पोहोचली. दिवसभरात सहा मृतदेह बाहेर काढण्यात बचाव पथकांना यश आले. मात्र, दुर्घटनेच्या ४८ तासांनंतरही १०५ जण बेपत्ताच असून, त्यांच्या शोधाची आशा मावळली आहे. खालापूरमधील इर्शाळगडाच्या पायथ्याशी वसलेली इर्शाळवाडी बुधवारी मध्यरात्री दरड कोसळून काळाच्या उदरात गडप झाली.

मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत राज्य शासनाने जाहीर केली आहे. मुख्यमंत्र्यांनी एवढ्यावरच न थांबता इर्शाळवाडीच्या अनाथ झालेल्या मुलांच्या शिक्षण आणि पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारली आहे. श्रीकांत शिंदे फाउंडेशनतर्फे मुलांच्या शिक्षणाची आणि पालनपोषणाची जबाबदारी घेण्यात आलीये. या दुर्घटनेनंतर गुरुवारी दिवसभर व शुक्रवारी शोधकार्य राबविण्यात आले.



शनिवारी सकाळी ती पुन्हा सुरू करण्यात येईल. दुर्घटनेनंतर गुरुवारी, पहिल्या दिवशी १६ मृतदेह ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी बाहेर काढलेल्या सहा मृतदेहांमध्ये तीन महिला आणि तीन पुरुषांचा समावेश आहे. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची संख्या २२ वर पोहोचली आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील नऊ जणांचा समावेश आहे. अद्यापही १०५ जण बेपत्ता असून, त्यांचा शोध घेण्याचे आव्हान बचाव पथकांपुढे आहे. इर्शाळवाडीत साथीचे रोग पसरण्याची भीती आहे. त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून फवारणी केली जात आहे. तसेच गावात तात्पुरते रुग्णालय सुरू करण्यात आले आहे, दुर्घटनेतील आठ जखमींवर उपचार सुरू आहेत. ६७ जणांना निवारा केंद्रात ठेवण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी दिली.

### सातपुडा पर्वत रांगांमध्ये ढगफुटी, बंधारा फुटून गावांमध्ये शिरले पाणी

सुराज्य/जळगाव

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या सीमेवर सातपुडा डोंगर रांगांमध्ये शनिवारी ढगफुटी झाल्यानंतर जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तसेच रावेर तालुक्यात हाहाकार उडाला आहे.

मुक्ताईनगर येथे मोठ्या प्रमाणावर तसेच प्रचंड झालेल्या पावसामुळे नदी नाले एकत्र होऊन मोठ्या प्रमाणावर पूर आला. या पुरामुळे मुक्ताईनगर तालुक्यातील जोंधणखेडा या ठिकाणी



असलेले कुंड धरण याठिकाणी उभारण्यात आलेला तात्पुरता बंधारा वाहून गेल्याने पुराचे पाणी चिंचखेडा, कुऱ्हा काकोडा आणि वडोदासह सहा गावांमध्ये शिरल्याने मोठं नुकसान झालं आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील या अतिवृष्टीची तसेच मातीचा बंधारा फुटल्याची माहिती मिळाल्यानंतर जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी तातडीने अधिकारी व कर्मचाऱ्यांना घेत मुक्ताईनगर गाठलं व या ठिकाणी परिस्थितीची पाहणी करत नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. जळगाव जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असून रावेर यावल व मुक्ताईनगर तालुक्यात सातपुडांच्या पर्वतरांगात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे.

### सोलापुरात पावसाची विश्रांती

सुराज्य/सोलापूर : सोलापूरसह जिल्ह्या शनिवारी पावसाने विश्रांती घेतली. दुपारी काही वेळ सूर्यदर्शन झाले पण पुन्हा ढगांची दाटीवाटी झाली.दरम्यान दौंडमधून उजनीमध्ये येणारा फ्लो शनिवारी कमी झाला. सायंकाळपर्यंत १८ हजार ८३६ क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता.या विसर्गाने धरणातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होत आहे.पुणे जिल्ह्यातही पाऊस थांबल्याचे वृत्त आहे.धरणात अजून पाणी येण्यासाठी पुणे जिल्ह्यात जोरदार पावसाची आवश्यकता आहे.

## बार्शीतील विकासकामांसाठी ३७ कोटी २९ लाख मंजूर : आ.राऊत

सुराज्य/बार्शी

बार्शी तालुक्यातील रस्ते दुरुस्तीसाठी जुलै २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात २५ कोटी १० लाख रुपये व सा.बा. उपविभाग व सा.बा.(रोहयो)उपविभाग बार्शी इमारतीचे बांधकाम करणे यासाठी ३ कोटी १६ लाख व सोलापूर जिल्हा वार्षिक योजनेतून उक्कडगाव येथील पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतर करणे यासाठी ४ कोटी ८१ लाख,पानगाव येथील क्र.१ पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतर करणे यासाठी ४ कोटी २१ लाख मंजूर झाला असल्याची माहिती आमदार राजेंद्र राऊत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बार्शी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्रमुख जिल्हा मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी चालू पावसाळी अधिवेशनात २०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये २५ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करून त्याची तरतूद पुरवणी अर्थसंकल्पात केली असून लवकरच रस्त्यांची कामे पूर्ण होणार आहेत.



अर्थसंकल्पात मंजूर झालेला निधी व तरतूद केलेल्या रस्त्यांची नावे व निधी पुढील प्रमाणे जामगांव बायपास ते बार्शी शहर हद्द व जैन मंदिर ते बार्शी शहर हद्द अशा रस्त्याच्या दोन भागासाठी १५ कोटी रुपये, देवगाव ते धस पिंपळगाव रस्त्यापैकी ३ किमीसाठी २ कोटी ५० लाख रुपये,आगळगाव ते काटेगाव रस्त्यापैकी ३ किमी साठी २ कोटी ५० लाख रुपये, खडकलगाव ते आगळगाव रस्त्यापैकी ३ किमी साठी २ कोटी ७० लाख रुपये, गूळपोळी ते मालवंडी २.५० किमीसाठी १ कोटी ४० लाख रुपये, जैन मंदिर ते पालके वस्ती येथील २.५० किमीसाठी १ कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग व सा.बा.(रोहयो)उपविभाग बार्शी इमारतीचे बांधकाम करणे यासाठी ३ कोटी १६ लाख मंजूर करण्यात आले आहेत. याचबरोबर जिल्हा नियोजनमधून बार्शी तालुक्यातील उक्कडगाव व पानगाव क्र.१ येथील पाझर तलावाची साठवण क्षमता वाढवून त्याचे साठवण तलावात रूपांतर करणेकामी सुमारे ९ कोटी ३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून शासनाकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचे आमदार राऊत यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कोणाला चिंता कशाची?

कल्याण
488-03-139

## सोलापूरच्या धार्मिक पर्यटनाला चालना देणार

### ■ नूतन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे शहरवासियांना आश्वासन

सुराज्य/सोलापूर

नूतन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शनिवारी पदभार घेतला. सोलापूरच्या धार्मिक पर्यटनाला चालना देणार असल्याचे मत पदभार घेताना व्यक्त केले.

नूतन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शनिवारी सोलापुरात येऊन मिलिंद शंभरकर यांच्याकडून पदभार घेतला. यावेळी पत्रकारांशी बोलताना कुमार आशीर्वाद म्हणाले सोलापूरचा भौगोलिक अभ्यास आहे. येथील समस्यांची जाण आहे. जिल्ह्यात पाणीटंचाई असल्याचे कळत तसेच जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्याकडून माहिती घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय ठेवून जिल्ह्याचा कारभार करू. सोलापूर जिल्ह्यात तीर्थक्षेत्र मोठया प्रमाणात असून तीर्थक्षेत्र विकासाला चालना देऊ अशी ग्वाही नूतन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

माझे वडील मोठे शिवभक्त आहेत सोलापुरात देखील मोठं शिवमंदिर असल्याचे समजले त्यामुळे मी सिद्धेश्वर मंदिराला आलो. आले दर्शन घेतलं भलं मोठे मंदिर पाहून समाधान वाटले . यावेळी मंदिर समितीच्या वतीने धर्मराज काडादी यांनी त्यांचे स्वागत करत सत्कार केला. त्यानंतर ते पदभार घेण्यापूर्वी पावणे बारा वाजता नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन झाले



यावेळी त्यांचे स्वागत निवासी उपजिल्हाधिकारी शंभरकर यांच्याकडून पदभार घेतला यावेळी सर्व उपजिल्हाधिकाऱ्यांची ओळख करून घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, महसूल उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, तहसीलदार सैफन नदाफ, दत्तात्रय मोहळे, खनिकर्म अधिकारी दिव्या शर्मा यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे स्वीय सहायक असिफ शेख, आमदार संजय शिंदे यांचे स्वीय सहायक संजय आंबोले यांनी नूतन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे स्वागत केले. त्यानंतर झेडपीचे सिईओ मनीषा आव्हाळे, मावळते सिईओ दिलीप स्वामी यांनी स्वागत केले.

**घरात तीन अधिकारी**

मूळ बिहारचे असलेले कुमार आशीर्वाद यांनी नाशिक मध्ये प्रांत म्हणून काम केल्यानंतर त्यांनी गडचिरोली हे ठिकाण मागून घेतले बाल मृत्यू, कुपोषित शिक्षणाचा दर उंचवण्यासाठी काम केले. परिवारात ते सर्वांत मोठे आहेत. त्यांचा लहान भाऊ देखील आयएएस असून ते झारखंड येथील हजेरीबाग येथे जिल्हाधिकारी आहेत. तर लहान बहिणीचे पती हे आयपीएस अधिकारी आहेत.

**चार महिन्यात सोलापूरची भाषा आत्मसात करु**

आपण मूळचे बिहारचे असलो तरी कार्यकाल सिंधुदुर्ग, नाशिक आणि गडचिरोली भागत राहिला आहे. त्यामुळे आपण मराठी चांगली बोलू शकतो मात्र सोलापूरची मराठी भाषा थोडी वेगळी आहे. मात्र ही सोलापुरी भाषा चार महिन्यात आत्मसात करू असे सांगितले.

CMYK

# शिक्षकाने मुलीची छेड काढत ठार मारण्याची दिली धमकी

## कव्हे येथील घटना

सुराज्य/कुर्डूवाडी

महाविद्यालयातून घरी चालत निघालेल्या मुलीस शिक्षकाने तिच्या समोर मोटरसायकल आडवी लावून, तिचा हात पकडून तू मला आवडतेस असे म्हणत होकार दे नाहीतर मी तुझ्या भावाला ठार मारेन अशी धमकी दिली. ही घटना १ जून रोजी, दुपारी १२.५० वाजणेच्या दरम्यान कव्हे ता. माढा शिवारात घडली. पिडीतेने भीतीपोटी दि. २१ जुलै रोजी, कुर्डूवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. यावरून एका शिक्षका विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कव्हे (ता.माढा) येथील प्रबोधनकार ठाकरे विद्यालयातील शिक्षक पांडुरंग यादव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परगावी शिकत असलेल्या महाविद्यालयास सुट्टी असल्याने पिडीत मुलगी आपल्या गावाकडे चालत जात होती. काही अंतरावर गेल्यानंतर प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे येथील शिक्षक पांडुरंग यादव यांने मोटरसायकल आडवी लाऊन मी एकटी असल्याचे पाहून त्याने माझा हात पकडून तू मला आवडतेस असे म्हणत होकार दे नाहीतर तुझा भाऊ शाळेत एकटा जातो येतो तुही एकटी ये-जा करतेस असे म्हणून तिला आणि भावाला ठार मारण्याची धमकी दिली.

मुलीने रडत घरी गेल्यावर घडलेला प्रकार आईला सांगितला. २१ जुलै शुक्रवार रोजी धाडस करून कव्हे येथील प्रबोधनकार ठाकरे विद्यालयातील शिक्षक पांडुरंग यादव याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कभी खुशी कभी गमप्रमाणे ठरला दिलीप स्वामी यांचा कार्यकाळ

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांची जिल्हा परिषदेतील अडीच वर्ष प्रशासकीय काम काजात कभी खुशी कभी गम मध्येच गेली . त्यांची शुक्रवारी अचानक बदली झाली. मात्र त्यांच्या अडीच वर्षाच्या कार्य काळात प्रथमता चार्ज घेतल्यानंतर त्यांनी विकास कामाता मोठी प्रगती करण्याचे ध्येय धोरण आखले होते .त्याप्रमाणे त्यांनी तीन-चार महिन्यात विकास कामाचे प्रगती करून दाखवली.

जिल्हा परिषदेच्या सदस्यांकडून स्वामी यांच्या कामकाजा संदर्भात नाराजी ऐकायला येत होते .त्यानंतर जिल्हा परिषद मधील अनेक विभागांच्या बदल्यांच्या संदर्भामध्ये त्यांच्या आर्थिक व्यवहार होत असल्याच्या अनेक तक्रारी पुढे आल्या होत्या मात्र स्वामींनी त्यावर मात करत आपले काम जोमाने पुढे नेले. यानंतर सदस्यांनी आम्हाला व्यवस्थित अधिकाऱ्याकडून वागणूक मिळत नसल्याने व आमची कामे वेळेत होत नसल्याने सभागृहात तक्रारी केले होत्या. त्यामुळे स्वामी हटवायची मोहीम जोरात करण्यात आली होती. अशातच पंचायत राज राज्य शासनाची चौकशी (आमदारांची ) पथकाने जिल्हा परिषदेला भेट दिली. या तीन दिवसाच्या भेटीत जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या चौकशी झाल्या. त्यात आरोग्य विभाग आणि शिक्षण विभाग यामध्ये मोठ्या तक्रारी असल्याच्या दिसून आल्या होत्या त्याम ुळे स्वामी अडचणीत आले होते .असे असताना स्वामी यांनी त्यावरही मात केली त्यानंतर राज्य शासनाचे अशाच प्रकारचे दुसरे पथक



मागील दीड वर्षांपूर्वी दाखल झाले होते. त्या पथकाकडूनही जिल्हा परिषदेचे तपासणी करण्यात आली होती. यामध्ये पाणीपुरवठा तसेच जल जीवन मिशनचे मोठ्या प्रमाणात काम सुरू होते त्या कामांमध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झाल्याचे दिसून आले होते तसेच या कामाचे टेंडर एकाच एजन्सीला देण्यात आली होती. त्यामध्ये टक्केवारीचा मोठा गोंधळ झाला होता. अशा प्रकारचे एक ना अनेक आरोप स्वामी यांच्यावर झाले होतेत्यांच्या कार्यकाळामध्ये अनेक तक्रारींना तोंड द्यावे लागले होते. त्यांच्याबद्दल अनेक तक्रारी थेट गल्लीपासून मंत्रालयापर्यंत गेल्या होत्या. त्यामुळे कलेक्टर होण्याचे स्वप्न लवकर साध्य होऊ शकले नाही.

### स्वामी यांनी राबवले अनेक उपक्रम

दिलीप स्वामी यांनी जिल्हापरिषदमध्ये अनेक उपक्रम राबवले. त्यामध्ये सायकलचा उपक्रम असेल, शैक्षणिक उपक्रम, असतील गाव स्तरावरील शाळा स्वच्छतेचा उपक्रम, असेल ग्रामपंचायत सुधारक कार्यक्रम, महिला बचत गटांचा पालेभाज्या मार्केट असेल असे एक ना अनेक उपक्रम राबवण्याचा त्यांनी सपाटा लावला होता. त्यापैकी सायकल उपक्रम हा राज्यांमध्ये अवल ठरला होता .त्याबाबत त्यांचे राज्य शासनाने कौतुकही केले. परंतु हे सर्व करत असताना खरे तर त्यांना तातडीने प्रमोशन मिळायला पाहिजे होते परंतु तसे झाले नाही.

# शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत सहभागी व्हावे : जगताप

सुराज्य/पिलीव

महाराष्ट्र शासनाने चालू खरीप हंगामापासुन केवळ एक रुपया भरुन प्रधानमंत्री पिंक विमा योजना सुरू केला आहे. हा पिक विमा शेतकऱ्यांनी ३१ जुलै पर्यंत भरावा असे आवाहन पिलीवचे मंडल कृषी अधिकारी सतीश जगताप यांनी केले आहे. पिक विमा प्रधानमंत्री पिक विमा पोर्टलवर याच नोंद करावी नोंदणी करण्यासाठी आधारकार्ड, पिक पेरा अहवाल, मोबाईल नंबर,७,१२,८ अ,बँक पासबुक या कागदपत्रांची आवश्यकता आहे. प्रतिकुल परिस्थिती मुळे पिंकाची पेरणी किंवा लावणी न होणे,हवामानातील बदलामुळे होणारे पिंकाचे नुकसान यामध्ये गारपीट, चक्रीवादळ, वादळ,क्षेत्र जलमय होणे,भुसखलन,दुष्काळ, पिकावरील रोग या बाबीमुळे होणारे नुकसान तसेच हंगामाच्या शेवटी नैसर्गिक कारणामुळे होणारे नुकसान यासाठी पिक विमा योजना लागु होते.खरीप हंगामातील सर्व पिकांसाठी सदरची पिक विमा योजना लागु आहे. फळबागेसाठी हवामान आधारीत पिक विमा योजना आहे. तरी पिलीव मंडलातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सदरचा पिक विमा ३१ जुलै पुर्वी भरुन या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन पिलीवचे कृषी मंडलाधिकारी सतीश जगताप यांनी केले आहे.



# महाराष्ट्र विद्यालयाचा संघ फुटबॉल मध्ये उपविजेता

सुराज्य/बार्शी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेमध्ये बार्शीच्या महाराष्ट्र विद्यालय मधील १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. सोलापूर येथील नेहरू मैदानावर या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालयाच्या संघातील खेळाडूंनी आपला उत्तम खेळ दाखवत उपविजेतेपद पटकावले.

यात विनित गपाट, व्यंकटेश सावळे, शिवम मोहिते, हर्ष बेणारे, ऋग्वेद मते, हर्षद पाटील, प्रणव हांडे, ओम उबाळे, ओम केसकर, दत्ता शिराळकर, प्रथमेश अवारे, ओंकार आवटे, अथर्व राऊत, कार्तिक आवटे, अथर्व यादव, श्रीनाथ राऊत या खेळाडूंचा समावेश आहे. यशस्वी खेळाडूंना ए.वाय. पाटील, पी.डी.पाटील, वाय. एस.उपळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी खेळाडूंचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्था पदाधिकारी यांनी तसेच मुख्याध्यापिका के.डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# कारगील विजय वर्धापनदिनी श्रद्धांजली कलशाचे पूजन

सोलापूर : सिटीजन सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने शनिवारी कारगिल विजय दिवसाच्या २४ व्या वर्धापनदिनानिमित्त युद्ध स्मारकाची प्रतिकृती आणि श्रद्धांजली कलशाचे पूजन करण्यात आले.

सिटीजन सोसायटी ऑफ इंडियाच्या सदस्यांचे शिष्टमंडळ कन्याकुमारी येथून युद्ध स्मारकाची प्रतिकृती आणि श्राधांजली कलश घेऊन सोलापूर रेल्वे स्थानकावर आगमन झाले. आगमन झाल्यानंतर उपजिल्हाधिकारी सोपान टोम्पे- पाटील व महानगरपालिकेच्या वतीने नगर अभियंता लक्ष्मण चलवादी तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने उपायुक्त विजय काबाडे यांच्या हस्ते युद्ध स्मारकाची प्रतिकृती आणि श्राधांजली कलश पूजन केले.

# जलवाहिनीला चिटकून बांधकाम करणाऱ्यांना नोटीस पाठवा

## अतिरिक्त आयुक्त कारंजे यांचे आदेश

सुराज्य/सोलापूर

उजनी ते सोलापूर दरम्यान बाळे येथे जलवाहिनीला चिटकून तेथील एक बांधकाम केले आहे का? या संदर्भात संबंधित बांधकाम धारकांना नोटीस पाठवून शहानिशा करण्यात यावी, असे आदेश महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी बांधकाम परवाना विभागाला दिले आहेत.

उजनी ते सोलापूर दरम्यान बाळे येथे जलवाहिनीला चिटकून बांधकाम करण्यात येत असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यानंतर महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी येथील जलवाहिनीची पाहणी केली. त्यानंतर येथील या जलवाहिनीला चिटकून संबंधित बांधकामधारकाने बांधकाम केले आहे का ? आवश्यक ती जागा सोडली आहे का? या संदर्भात बांधकाम परवानगी तपासावी. शहानिशा करावी, असे आदेश महापालिका बांधकाम परवाना विभागाला अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिले आहेत.

बांधकाम परवाना तपासून शहानिशा करून या प्रकरणी कारवाई करण्यात येईल त्याचबरोबर बांधकाम परवाना चुकीच्या पद्धतीने दिलं असेल तर कारवाई करण्यात येईल, असेही अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# वीर धरणामधून नीरा उजवा कालव्याला पाणी सोडा

## आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांची मागणी

सुराज्य/अकलूज

महाराष्ट्रात मान्सून सुरू झाला तरी अद्याप सोलापूर जिल्ह्यातील निरा उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रात पावसाचे आगमन लांबणीवर गेले आहे. शेतकरी हवालदिल झाले असून पेरणी वेळेवर होण्याकरिता बळीराजा आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. ऊस लागवडी करीता जमिनीची मशागत करून ठेवलेली परंतु पाण्या अभावी ऊस पिकांची लागवड झालेली नाही .शेतकऱ्यांची इतर उभी पिके धोक्यात आलेली आहेत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा व पिकांना पाणी देण्यासाठी वीर धरणामधून पंढरपूर माळशिरस सांगोला ,फलटण तालुक्यासाठी पाणी सोडण्यात यावे अशी सुचना आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता गुणाळे यांच्याकडे केली.

मागील काही वर्षापासून शेतकरी कोरोनामुळे तसेच शेतीमालाला योग्य दर मिळत नसल्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. त्यातच अद्यापपर्यंत मान्सूनचा समाधानकारक पाऊस पडला नसल्याकारणाने बळीराजाला पुन्हा आर्थिक संकटांची चिंता जाणवू लागली आहे. शेतकऱ्यांनी उभ्या केलेल्या फळबागा पिके पाण्याअभावी जळू लागल्या आहेत.

शेतकऱ्यांनी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे वीर धरणाम धून निरा उजवा कालव्याला आवर्तन सोडण्यात यावे म्हणून मागणी केली होती. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेत आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी तात्काळ जलसंपदा विभागचे मुख्य अभियंता गुणाळे यांना सुचना केली असता येत्या दोन ते तीन दिवसांत धरणामधून पाणी सोडण्यात येईल असे सांगितले.

# पंचकट्टा ते विजापूर वेस भागातील अतिक्रमण काढले

सुराज्य/सोलापूर

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक पथकाकडून आज शुक्रवारी पंचकट्टा ते विजापूर वेस आणि लक्ष्मी मार्केट परिसरातील अतिक्रमण काढण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दोन महिन्यापासून नियमितपणे शहरात रहदारीस अडथळा ठरणारे व फुटपाथ वरील अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून आज शुक्रवारी पंचकट्टा ते विजापूर वेस येथील रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची कारवाई करण्यात आली.

यादरम्यान, एक सिंटेक्सची टाकी, चार चाकी एक गाडी, चार लोखंडी दरवाजे व बांबू यासह साहित्य पथकाने जप्त केले. तसेच विजापूर वेस येथील कोपऱ्यावरील एक पत्रा शेड जागेवरच जेसीबीच्या साह्याने निष्काशीत करण्यात आले. त्यानंतर लक्ष्मी मार्केट येथील रस्त्यावर ठेवण्यात आलेल्या तीन लोखंडी छत्र्या निष्कासित करण्यात आल्या. सर्व नागरिक व व्यापाऱ्यांनी महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे. अतिक्रमण आढळून आल्यास जप्ती व फौजदारी कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

# ३४ रुपये दराचा शासन अध्यादेश मानत दूध उत्पादकांच्या तोंडाला पुसली पाने

सुराज्य/सोलापूर

राज्यातील दुध संघाच्या मनमानी करभाराला चाफ लावण्यासाठी नुकतेच महाराष्ट्र शासनाने गायीच्या दुधासाठी म हाराष्ट्रात ३.५/८.५ गुणप्रतिस ३४ रुपये दर देणे बंधनकारक असेल असा अध्यादेश जारी केला. सदरचा अध्यादेश म्हणजे दूध उत्पादकांची शुद्ध फसवणूक असून दूध उत्पादकांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असल्याचे मत शेतकऱ्यातून व्यक्त होत आहे.

दुध उत्पादकांच्या आक्रमक पवित्र्यानंतर दुग्ध व पशुसंवर्धनमंत्री राधाकृष्ण विखे पाटील दुध दर निश्चितीसाठी समितीची स्थापना करून अहवाल सादर केला.त्या समितीच्या अहवालानुसार गाईच्या दुधाचे दर ३४ रूपये प्रतिलिटर निश्चित करण्यात आले व त्यांची दि.२१ अंमलबजावणी करण्याचे आदेश दूध संघांना देतात आले परंतु दुध संघांनी पुन्हा शब्दांचे खेळ करीत सरकारकडून पाठ थोपटून घेत असताना शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे नवीन दुध दर पत्राकावरून स्पष्ट होत असल्याने शेतकऱ्यांतून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.



शासनाने दोन ओळीचा अध्यादेश काढला आणि सगळे मंत्रिमंडळ स्वतःचीच पाठ थोपटून घेण्यात मग्न आहे. सदरच्या अध्यादेशा मुळे दूध उत्पादकांचा फायदा होण्याऐवजी नुकसानच जादा होणार आहे. त्याच कारण अस की शासनाने ३.५/८.५ गुणप्रतिस ३४ रुपये दर असा उल्लेख सोडून कोणतीही मार्गदर्शक नियमावली जारी केली नाही. त्यामुळे सोलापूर, पुणे ,सातारा, नगर या जिल्ह्यातील प्रमुख सहकारी व खाजगी दूध संघांनी आपापल्या हिशोबाने मनमानी करण्यास सुरुवात केली आहे.

३.५/८.५ गुणप्रति व्यतिरिक्त त्याखालील गुणप्रतिस किती दर द्यावा अशी कोणतीही मार्गदर्शक नियमावली जारी नसलेमुळे आपापल्या पद्धतीने दरामध्ये कपात करायला सुरुवात केली आहे. पूर्वी ३.५ फॅटच्या खलील प्रत्येक गुणप्रतिस ५० पैसे प्रमाणे कपात होती, तसेच डछ्रू ८.५ खालील प्रत्येक गुणप्रतिस ३० पैसे प्रमाणे कपात होती. नवीन अध्यादेश आल्यानंतर या संघांनी पळवाट काढली आहे. फॅटच्या गुणप्रतिस ५० पैसे कपात तशीच ठेवली मात्र डछ्रू ८.५च्या खालील प्रत्येक गुणप्रतिस ३० पैसे ऐवजी एक रूपायाने कपात करणेस चालू केली, म्हणजे ३.५/८.५ ला ३४ रुपये दर आहे असे समजल्यास त्यावेळी जुन्या दरपत्रकाप्रमाणे ३.३/८.२ ला दर मिळाला असता ३२.१० रुपये पण नवीन दरपत्रकाप्रमाणे ३० रुपये दर मिळणार आहे.म्हणजे २.१० रुपये तोटा होणार आहे.

# ध्येयनिष्ठ कर्मयोगी कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सर

**खरंच सरांच जगणं हे एका ध्येयनिष्ठ कर्मयोगी प्रमाणे होते. स्वतःसाठी जगता आलं नाही तरी इतरांसाठी जगावं, इतरांच्या डोळ्यातील अश्रू पुसताना त्यातच आपलं प्रतिबिंब पहावं या उक्तीप्रमाणे संपूर्ण आयुष्य जगलेल्या सरांना खरोखर स्वतः साठी जगताच आले नाही याची खंत माझ्यासारख्या सरांच्या संस्थेत कार्यरत असलेल्या व सरांच्या सहवासात वावरलेल्या सरांचा स्वभाव ,त्यांची काम करण्याची पद्धत, सचोटी, जिद्द, चिकाटी, मेहनत, कार्यकुशलता , क्षमता ,तत्परता पाहिलेल्या असंख्य कार्यकर्त्यांच्या मनात आजही कायम आहे.साधी राहणी, उच्च विचारसरणी यापद्धतीने जीवन समर्पित केलेल्या सरांविषयी लिहावे तितके कमी आहे. माणूस जेंव्हा एका विशिष्ट ध्येयांनी प्रेरित होतो तेंव्हा अखंड परिश्रम,त्याग,संघर्ष,तहान-भूक विसरून त्याच्यामागे कसा धावतो याच एक मुर्तीमंत प्रतीक म्हणजे कै.आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सर.**

हरणा नदीच्या काठावर वसलेलं जेम तेम चार -पाच हजार लोकवस्तीचं गाव. या गावात माता गुरुबसव्वा व पिता तिप्पणा या दांपत्याच्यापोटी ४ जानेवारी १९४७ला एक पुत्र-रत्न जन्माला आला .ज्या बाळाच नांव ठेवण्यात आल पंचप्पा. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे हे मुल जन्मापासुन जात्याच हुशार आहे हे वडिलांच्या लक्षात आले. वडिल अशिक्षित असले तरी शिक्षणाचे महत्त्व जाणून होते.शिक्षणाविषयी मनामध्ये प्रचंड आस्था व तळमळ होती.परंतु परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. चार मुली, तीन मुले असल्याने कुटुंबाचा खर्च मोठा पण त्या प्रमाणात उत्पन्न कमी व सार कांही शेतीवर अवलंबून असलेल. मुलांना शिकवलं पाहिजे ही आतंरिक इच्छा होती पण अडचण पाठ सोडत नव्हती .सरांच व दोन्ही भावंड मल्लप्पा व सिद्धप्पा यांचे प्राथमिक शिक्षण हन्नूरच्या जिल्हा परिषद शाळेत पुर्ण झाले. पण पुढील शिक्षणासाठी सोलापूरशिवाय पर्याय नव्हता. तशातच औताचं एक बैल वारलं. हल्या - बैलाची जोड करून शेती केली पण परिस्थितीपुढे हार न मानता पंचप्पा, मल्लप्पा व सिद्धप्पा या तिन्ही मुलांना शिक्षणासाठी सोलापूरला ठेवलं. मुलांना ही परिस्थितीची, वडिलांची होत असलेली ससेहोलपट तसेच शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव होती. पंचप्पा सरांनी आपल एम.ए.बी. एड. पर्यंतच शिक्षण पूर्ण केलं आणि त्यांना जवळच्या चप्पळगावच्या शाळेत नोकरी लागली. कधी पायी,कधी सायकलवर असं करत सर चप्पळगावला जातं.त्यावेळी गावाला वेळेवर एस.टी. ची. सोय नव्हती.दुसरे भाऊ मल्लप्पा यांचं ही शिक्षण पुर्ण झालं आणि ते ही किणीच्या हायस्कूल मध्ये नोकरीस लागले. सरांच्या स्वभावातच समाजसेवेची ओढ असल्याने कांहीतरी आपण समाजासाठी, गावांसाठी केलं पाहिजे ही भावना सरांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यावेळी हन्नूर व परिसरातील नन्हेगाव, पितापूर, सुलतानपूर या शेजारच्या गावातील मुलां-मुलींसाठी प्राथमिक शिक्षणानंतरच्या पुढील शिक्षणाची सोय नव्हती त्यांना दूरवर पायपीट करत जावं लागायचं, पुढील शिक्षणाची सोय नसल्याने विशेष करून मुलींना इच्छा असूनही शिक्षणापासून वंचित राहावं लागायचं हे सर्व ओळखून त्या सर्वांच्या शिक्षणाची सोय व्हावी, त्यांची पायपीट थांबावी याकरिता गावातल्या समविचारी, उच्चशिक्षित मित्रांना सोबत घेऊन तसेच भरत-लक्ष्मणासारखे सावली प्रमाणे पाठीशी उभे असणाऱ्या मल्लप्पा व सिद्धप्पा या दोन भावंडांच्या मदतीने महर्षि विवेकानंद सम ाजकल्याण संस्थेची सन १९७०साली स्थापना केली. संस्थेच्या उद्यमेन हि सिद्‌य्यंति कार्याणि न मनोरथैः या ब्रीदवाक्याप्रमाणे कामाला सुरुवात केली. पहिल्यांदा गावातील तरुणांम ध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी संत ज्ञानेश्वर वाचनालय (सन १९८४)सुरू केले. नंतर एका वर्षांतच अनंत चैतन्य प्रशाला(सन १९८५) या नावाने माध्यमिक शाळा काढली व या भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली.सरांचे धाकटे बंधू सिद्धप्पा हे या शाळेत मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. या शाळेत शिकणाऱ्या गरीब, होतकरू मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी यासाठी तक्षशिला विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. आज या शाळेत ५३५ हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मिळून २६ जण कार्यरत आहेत. या प्रशालेत नोकरीची संधी उपलब्ध करून देऊन या भागातील व गावातील गरजू सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे संसार उभे केले व इथूनच सरांच्या लोककल्याणकारी कार्याला खऱ्या अर्थानं सुरूवात झाली. सर मुळात ध्येयवादी तर होतेच, सोबतच कुशाग्र बुद्धीमत्ता, प्रचंड आत्मविश्वास , जबरदस्त इच्छाशक्ती,दुरदृष्टी हे गुण अंगी असल्याने तासंतास बसुन स्वतः काम करण्याची, तसेचहाती घ्याल ते तडीस न्याया उक्तीप्रमाणे पाठपुरावा करून काम करवून घेण्याची हातोटी असल्यामुळे स्वस्थ बसतील ते सर कसले?



कै.पंचप्पा कल्याणशेट्टी सर

क्रीडांगण विकास योजना, युवकांकरिता व्यायाम शाळा, राळेगणसिद्धीच्या धर्तीवर ग्रामविकास योजना, वृक्षसंवर्धन, वृक्षलागवड करण्यासाठी रोपवाटीका, निर्मल ग्राम, निरोगी ग्राम विकास योजना,मोफत सर्वरोग निदान व चिकित्सा शिबीर, महिला समुपदेशन केंद्र, अल्पभूधारक शेतकऱ्यांकरिता मार्गदर्शन व अत्यल्प भाडेतत्त्वावर अवजारे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृषी सेवा केंद्र व बी-बियाणे खरेदीसाठी अर्थसहाय्य, धान्य बँक योजना , राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, महिला जाणीव जागृती अभियान , महिला बचतगट स्थापनेकरिता मार्गदर्शन व प्रोत्साहन अशी अनेक समाजहिताची कामे समाजसेवेचं व्रत स्वीकारलेल्या सरांनी संस्थेच्या व विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून अतिशय कार्यक्षमपणे राबविले. समाजकारणासाठी राजकारणाची जोड असावी लागते याकरिता सरांनी राजकीय क्षेत्रात ही काम केलं मात्र मिळालेल्या पदांचा उपयोग ही सरांनी समाजकार्याकरिताच केला. त्याबरोबरच सौ.सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अक्कलकोट .अनंत चैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय हन्नूर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र , नालंदा मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, अक्कलकोट, मातोश्री गुरुबसव्वा महिला महाविद्यालय,गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी शाळा,डे-स्कुल,योग- प्राणायाम प्रशिक्षण केंद्र,

अशा विविध शैक्षणिक विभागाच्या वतीने लहान मुलें-मुलीं,युवक-युवती, सेवांतर्गत महिला-पुरूष या सर्वांकरिता शिक्षणाची दारे खुली केली. हन्नूर सारख्या खेड्यात लावलेल्या एका संस्थारुपी इवल्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. आज अनेक मुलें - मुली या वृक्षाची गोड फळे चाखत आहेत, अनेक जण या वृक्षाच्या सावलीत विसावत आहेत.ही संस्थेची धुरा आज सरांचे सुपुत्र, अक्कलकोट विधानसभा म तदारसंघांचे आमदार व संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.सचिनदादा कल्याणशेट्टी आपल्या खांद्यावर घेऊन चुलते श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी व श्री. सिद्धप्पा कल्याणशेट्टी या दोघांच्या विचारांने आणि मार्गदर्शनाने व त्यांच्या धर्मपत्नी सौ. शांभवीताई, बंधू मनोज,मिलन व सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या साथीने व सरांनी केलेले संस्कार,त्यांची शिकवण व प्रेरणेतून अत्यंत सक्षमपणे सांभाळत आहेत व त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने मार्गक्रमण करीत असून त्याचा आणखीन विस्तार करण्याबरोबरच सरांचे प्रत्येक स्वप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

आज त्यांच्या ८ व्या स्मृतिदिनानिमित्त सरांना विनम्र अभिवादन व सरांच्या आत्म्यास चिरशांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**- अशोक शरणप्पा साखरे**
पर्यवेक्षक, अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, हन्नूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# राज्यातील बदलत्या समिकरणांनी कार्यकर्त्यांची होतेय गोची

## आपापला प्रभाग सेफ करण्याकडेच सर्वांचा कल

### कुरघोड्यांचे राजकारण त्यांचे चालूच राहणार

आगामी सोलापूर महापालिका निवडणूक भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट एकत्रित लढविल्यास या तिघांचीच सत्ता येणार हे निश्चित आहे. मात्र कोणत्या प्रभाग कोणाला सुटणार, कोणाला उमेदवारी मिळणार यासाठी एकमेकांवर कुरघोड्यांचे राजकारण त्यांचे चालूच राहणार, असे चित्र दिसून येत आहे.

सुराज्य/सोलापूर

राज्यातील राजकीय समीकरणे बदलत असल्याने स्वबळावर निवडणुका लढवण्याची घोषणा करणाऱ्या भाजपने आता राज्यातील सत्तेत शिंदे गटाची शिवसेना यानंतर आता अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सामावून घेतले आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांची गोची होत आहे. आगामी सोलापूर महापालिका निवडणुकीला कशा पद्धतीने सामोरे जाणार? असे प्रश्न कार्यकर्त्यांसमोर उभा रहात आहे. त्यामुळे ते आता राज्य आणि केंद्राच्या राजकारणात लक्ष न घातला आपापला प्रभाग सेफ कसा होईल याचे नियोजन करत आहेत.

पुढील वर्षी एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुका होणार आहेत. मात्र, त्यापूर्वीच महापालिका निवडणुका होण्याची शक्यता आहे. सोलापूर महापालिकेत गतवेळी २०१७ साली काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता दूर करून भाजप प्रथमच सत्तेत आली. १०० पैकी ४९ नगरसेवक निवडून आले. त्यामुळे पुढील निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता आणण्याची घोषणा दिली होती. परंतु, आता नवा भिडू राष्ट्रवादी मिळाल्याने त्यांना आणि शिवसेना जागा सोडाव्या लागणार आहेत. असे झाल्यास भाजपची एक हाती सत्ता मिळवण्याची घोषणा हवेतच विरणार आहे. पण, सत्तेत राहण्याची खात्री निर्माण झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा निर्णय शहर आणि जिल्ह्यातील परिस्थिती पाहू घेऊ असे सांगितले असले तरी महापालिकेनंतर होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचा मोठा फायदा होणार असल्याने त्यांच्याशी भाजपला महापालिका निवडणुकीत तडजोड करावीच लागणार आहे, असे बोलले जात आहे. असे झाल्यास सोलापुरात भाजपाची मोठी गोची होणार आहे. अधिच भाजपाकडे इच्छुकांची संख्या जास्त आहे. अशातच त्यांना आता शिवसेना आणि राष्ट्रवादीला जागा सोडाव्या लागणार आहेत. सध्या शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादीची ताकद कमी दिसत आहे. मात्र पुढील काळात कोणत्या मोठ्या नेत्यांना सेना अथवा राष्ट्रवादीत प्रवेश केला तर राजकीय समिकरण पुन्हा बदलणार आहे. सध्याच्या राजकारणात काहीही होऊ शकते हे मागिल साडेतीन-चार वर्षात सर्वांनी पाहिले आहे. त्यामुळे कार्यकर्तेही संभ्रमावस्थेत आहेत. त्यामुळे ते आता राज्य आणि केंद्राच्या राजकारणात लक्ष न घातला आपापला प्रभाग सेफ कसा होईल याचे नियोजन करत आहेत.

## भाजपा शहरमध्य तर्फे सेवा दिन विविध उपक्रमाने साजरा

**सोलापूर** : रायगड जिल्ह्यातील दुर्घटनेमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै रोजी कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम आयोजित न करता हा दिवस सेवा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. सेवा दिनीच्या माध्यमातून मार्कंडेय नगर कुमठा नाका येथील बालाजी मंदिर येथे शहर मध्य विधानसभेच्या वतीने माजी महापौर श्रीकांचनाताई यन्नम यांनी मोफत आरोग्य तपासणी व औषधे शिबीर, नेत्र तपासणी शिबीर, नव मतदान नोंदणी अभियान या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमासाठी लोकसभा निवडणूक प्रभारी विक्रम जी देशमुख, नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे, संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, उपाध्यक्ष विजयाताई वड्डेपल्ली, चिटणीस अनिल कंदलगी, नागेश सरगम , ज्येष्ठ नेते अंबादास बिंगी, रमेश यन्नम,दक्षिण भारत आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र संयोजक रवी भवानी, दत्तात्रय पोसा यांची प्रमुख उपस्थिती होती.



मुस्लिम बांधवांचा मोहरम सण जवळ आला आहे. त्यानिमित्त शहरात विविध ठिकाणी पंजाची स्थापना करण्यात आली आहे. बाळीवेस भागातील छायाचित्र.

## श्री स्वामी समर्थ रुग्णालयात होमिओपॅथिक शिबिर

सुराज्य/अक्कलकोट



येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व मुंबई येथील डॉ.प्रफुल्ल विजयकर होमिओपॅथिक रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होप फॉर होपलेस मोफत एकदिवसीय होमिओपॅथिक शिबिर आज मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील भक्तनिवास समोरील श्री स्वामी समर्थ रुग्णालयात संपन्न झाला.

डॉ.प्रफुल्ल विजयकर व टीमच्या वतीने या शिबीरात मतिमंद, गतिमंद, कर्णबधीर, मुकबधीर, शारिरीक व्यंग, मानसिक अधू इत्यादी विकारांवर २० वर्षाखालील मुला मुलींची तपासणी करून रुग्णांना मोफत औषधोपचार उपलब्ध करून देण्यात आले. १५६ रुग्णांनी या शिबीराचा लाभ घेतला. मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथील डॉ.प्रफुल्ल विजयकर होमिओपॅथिक रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनचे तज्ञ संस्थापक डॉ. अंबरीश विजयकर, डॉ.प्रदीप विजयकर, डॉ.तन्मय विजयकर, डॉ.अपर्णा सामळ, डॉ.श्वेताली विजयकर, डॉ.क्षितिज जोशी, रजत मालोकर, अभिषेक आदींसह मंदिर समितीच्या सेवेकऱ्यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, शिवशरण अचलेर, प्रथमेश इंगळे, चंद्रकांत सोनटक्के, सुनील पवार, श्रीशैल गवंडी, अमर पाटील, रवी मलवे, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

## जप्त केलेला ७० लाखाचा गांजा जेलरोड पोलिसांनी केला नष्ट

सुराज्य/सोलापूर

जेलरोड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेला ७० लाखाचा ७० किलो गांजा व २ हजार ५३३ किलोग्रॅम अफुची बोंडे भोगाव येथील बायोक्लीन सिस्टीम इंडिया येथे जेलरोड पोलिसांनी नष्ट केला आहे.पोलिस आयुक्तालय अंतर्गत एन. डी. पी. एस. कायदयान्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामधील जप्त मुद्देमाल सन १९९२ पासून नाश करण्यासाठी प्रलंबित होता. हे आमली पदार्थ जेलरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जाफर मोगल यांनी सफौ नाईकनवरे राजू वाघमारे यांच्या मदतीने एकुण २ हजार ५३३.८६७ किलोग्रॅम अफूची बोंडे व ७०.१२ किलोग्रॅम गांजा असा एकुण ७० लाख रूपये किमतीचे शुक्रवारी ड्रग डिस्पोजल कमिटी समोर योग्य रित्या नाश केला.

ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उप आयुक्त अजित बो-हाडे, पोलीस उप आयुक्त गुन्हे डॉ. दिपाली काळे, सहा पोलीस आयुक्त गुन्हे प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, रत्ना सोनवणे, अजय गुंड व राजू वाघमारे यांनी केली.

## सोमवारी डॉ. पवार लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

सुराज्य/सोलापूर

केगाव येथील नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेंटर फॉर रिसर्च अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट चे डायरेक्टर,ज्येष्ठ संशोधक डॉ. शिवाजी.एच.पवार लिखित व नोव्हा सायन्स पब्लिशर्स,यु. एस. ए. प्रकाशित सिल्क फायब्रोईन: ॲडवांसेस इन ॲप्लिकेशन अँड रिसर्च या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सोमवार २४जुलै रोजी सकाळी १० वाजता सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात होणार आहे, अशी माहिती सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी दिली.

विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते व सिंहगड इन्स्टिट्यूट चे कॅम्पस डायरेक्टर श्री. संजय नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

## सिव्हील हॉस्पिटलला भाजपातर्फे व्हीलचेअर

सुराज्य/सोलापूर



भारतीय जनता पक्ष शहर उत्तर विधानसभेतर्फे छत्रपती श्री शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयास व्हीलचेअर भेट देण्यात आल्या. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी हा उपक्रम राबविण्यात आला.

छत्रपती श्री शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाच्या बी ब्लॉकमध्ये या व्हीलचेअर सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख म्हणाले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासाभिमुख नेतृत्व आहे त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला हीच त्यांच्यासाठी सगळ्यात मोठी भेट ठरली आहे. सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात हजारो रुग्ण शहर आणि जिल्हा परिसरातून येतात. त्यांच्या सोयीसाठी ह्या व्हीलचेअर उपयुक्त ठरणार आहेत.

याप्रसंगी भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, वैद्यकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विठ्ठल धडके, शल्यचिकित्सा शास्त्र विभागप्रमुख डॉ. ऋत्विक जयकर, स्त्रीरोगशास्त्र विभागप्रमुख डॉ. विद्या तिरंकर, वैद्यकीय अधिक्षक डॉ. रामेश्वर डावकर, माजी सभागृह नेते संजय कोळी, शहर उत्तर सहप्रभारी राजकुमार पाटील, भारतीय जनता युवा मोर्चा शहराध्यक्ष गणेश साखरे, प्रसाद कुलकर्णी, राजाभाऊ काकडे, सतिश महाले, बाबूराव जमादार, नागेश येळमेली, अजित गादेकर, बसवराज गंदगे, प्रेम भोगडे, गणेश सुरवसे, शिवकुमार कामाठी, राम वाकसे, अभियंता अमित गुंगे, ॲड. साखरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.






# तरुण पिढीच नवभारताची निर्मिती करेल : शीला स्वामी

सुराज्य/सोलापूर

**तरुण पिढी हे भारताचे भविष्य आहे. ही तरुण पिढीच नवभारताची निर्मिती करेल, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयो समन्वयक शीला स्वामी यांनी केले.**

शनिवारी हुतात्मा स्मृती मंदिर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विकासार्थ विद्यार्थी यांच्यातर्फे आयोजित 'जी ट्वेंटी युवा संवाद- भारत २०४%' या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे होते. व्यासपीठावर राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, रासेयो जिल्हा समन्वयक



डॉ. वीरभद्र दंडे, विकासार्थ विद्यार्थीचे निमंत्रक प्रा. तात्यासाहेब घावटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. शीला स्वामी पुढे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक हे विविध उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने सक्रिय असतात. स्वयंशिस्त आणि समर्पण हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील भारत घडवण्यासाठी पंचप्रण महत्त्वाचे आहेत. त्या मूल्यांची जोपासना अशा कार्यक्रमांतून होत असते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे प्र- कुलगुरु डॉ. गौतम कांबळे म्हणाले की, जगात भारताची चर्चा होण्यामागचे कारण म्हणजे भारतात सर्वाधिक संख्या असणारे तरुण. भारत हा तरुणांचा देश आहे. युवकांकडून राष्ट्र निर्माणचे कार्य घडवून आणण्यासाठी तरुणांना स्टार्टअपसाठी प्रोत्साहित करायला हवे. विद्यापीठाने यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. विद्यापीठाने इंक्युबेशन आणि इनोव्हेशन केंद्र सुरू केले आहे. त्याद्वारे तरुणांच्या उद्यमशीलतेला चालना दिली जात आहे. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी त्यांच्या हाताला काम मिळण्याची गरज आहे. अशा युवा संवाद कार्यक्रमातून तरुणांना दिशा मिळेल. या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले.



## शिक्षण उपसंचालकांची मल्लिकार्जुन हायस्कूलला भेट

**सोलापूर** : शिक्षण उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी मल्लिकार्जुन हायस्कूलला भेट दिली. त्यांनी शालेय समिती अध्यक्षाशी चर्चा करून योजनेच्या अंमलबजावणी बाबत शिक्षणाधिकारी (योजना) श्रीमती सुलभा वठारे मॅडम यांनीही म ार्गदर्शन केले. देशातील नागरिकांना साक्षर बनवण्याचे कार्य शिक्षक,स्वयंसेवक,पालक,विद्यार्थी यांच्या माध्यमातून करावे असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी दक्षिण सोलापूर विस्तार अधिकारी राजकुमार नागणसुरे, उ.सोलापूरचे माजी गटशिक्षणाधिकारी बापूराव जमादार, शालेय समिती अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे,काशिनाथ मळेवाडी, पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार, महेश चिवरे,बसवराज कोरे हे उपस्थित होते.

## अंकलगे येथे मृत वानराच्या जागी मंदिर बांधण्याचा निर्णय



**अक्कलकोट** : अंकलगे (ता. अक्कलकोट) येथे अधिक मास शुभदिवस शनिवार रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास वानर मृत झाले. हा योगायोग खूप दिवसाने जुळुन आल्याने अंकलगे ग्रामस्थांनी हा शुभ संकेत समजुन विधीवत अत्यंविधी करावयाचे ठरले. त्यानिमित्त शनिवारी भजन करत अत्यंविधी मिरवणूक निघाली. अंकलगे येथिल नवीन गावठाण जागेत बजरंग बली हनुमान मंदिरची स्थापन करणार आहे अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.यावेळी गावकरी व हनुमान भक्त उपस्थित राहून अत्यंदर्शन घेतले. अंकलगे गेल्या दोन महिन्यापासुन दहा बारा वानरांचा कळप गावात राहत आहे. एक वानर पन्होळे वरून उडी मारून जात असताना पाईप तुटुन इलेक्ट्रिक शॉंक लागुन आपघाती निधन झाले. मयत वानराचे नवीन गावठाण येथे दफन करण्यात आले. त्याच ठिकाणी मंदिर बांधण्याचा निर्धार ग्रामस्थानी केल्याचे सरपंच मारुती कोळी यांनी सांगितले.

## प्लास्टिक विरोधी मोहिमेंतर्गत महापालिकेची आस्थापनांवर कारवाई

**सोलापूर** : सोलापूर महापालिकेच्या पथकाकडून शहरात विभागीय कार्यालय क्रमांक सात अंतर्गत परिसरात प्लास्टिक विरोधी मोहीम राबविण्यात आली. यावेळी दोन आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एकूण दहा हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या आदेशानुसार मुख्य सफाई अधीक्षक एन.सी.बिराजदार सफाई अधीक्षक अनिल चाराटे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य आरोग्य निरीक्षक शकील नालामंदू यांच्या माध्यमातून प्लास्टिक विरोधी मोहीम राबविण्यात आली.२२ आस्थापना तपासण्यात आल्या. अंदाजे दिड ते दोन किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. आणि दोघांवर प्रति ५ हजार रुपये प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात आली.

## गीता घाटणेकर यांचे निधन



**सोलापूर** : रेल्वे वाणिज्य विभागातील मुख्य कार्यालय अधीक्षक गीता शशांक घाटणेकर वय( ५९) यांचे शुक्रवार दिनांक २१ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झालं आजारपणामुळे त्यांनी स्वच्छ निवृत्ती घेतली होती काल सकाळी त्यांची प्राण ज्योत मावळली त्यांच्या पश्चात पती शशांक घाटणेकर मुलगा मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अग्निसंस्कार करण्यात आले

# रोटरी क्लब जीव ओतून काम करणारा क्लब : शहा

सुराज्य/सोलापूर





रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ हा क्लब सामाजिक कार्यात 'हाती घ्यावे ते तडीस न्यावे' या उक्ती प्रमाणे जीव ओतून काम करतो. स्थापनेच्या पन्नास वर्षातील सामाजिक कार्याची सतत चढती कमानच आहे, असे गौरवोद्गार डी जी ई रोटेरियन शीतल शाह यांनी काढले. रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयास दिलेल्या सदिच्छा भेटीत ते बोलत होते. या शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्साह, शाळेचे कामकाज, कर्मचाऱ्यांचे योगदान बघून ते भारावून गेले .

प्रारंभी रोटरी नॉर्थ चे नूतन अध्यक्ष ॲड. मल्लिकार्जुन अष्टगी यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला तर असिस्टंट गव्हर्नर जयेश पटेल यांचा सत्कार शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केला. शीतल शहा यांच्या पत्नी रागिणी शाह यांचा सत्कार मुख्याध्यापिका गाताडे यांनी केला. नूतन सचिवा जान्हवी माखीजा यांचा सत्कार रागिणी शहा यांनी केला. स्वागत आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. आभारप्रदर्शन शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केले. तर सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले. या समारंभास सचिव सुनील दावडा, खजिनदार राजगोपालजी झंवर, डॉ सिद्धेश्वर वाले, जान्हवी माखीजा, रेणुका पसपुर्ले, संध्या चंदनशिवे, विजया पिटाळकर, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, सैपन बागवान, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभावी , अजित पाटील, साहेबगौडा पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार आदी उपस्थित होते.

# कुसमोड येथील रस्त्याला निधी देण्याची मागणी

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील कुसमोड गावातील रस्त्याची अवस्था दयनीय आहे. पंढरपूर - सातारा रस्त्यापासुन कुसशोड गावात येणारा एक डांबरीकरण झालेला रस्ता आहे सध्या तो अतिशय खराब झाला आहे.

त्यासाठी आ. सातपुते यांनी निधी द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. गारवाड - चांदापुरी - कुसमोड - मळोली ( प्रमुख जिल्हा मार्ग - २१७) म्हणजेच या अगोदरचा इतर जिल्हा मार्ग ७० हा रस्ता खरे तर कोळेगाव, काळमवाडी, फळवणी,साळमुखवाडी, कुसमोड येथील नागरिक, विद्यार्थ्यांना माळशिरस, अकलुज, पुणे, शिंगणापूर या ठिकाणी जाणयासाठी अतिशय सोईस्कर तसेच जवळचा मार्ग आहे. मात्र कुसमोड गावापासून चांदापुरी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. जि. प. सदस्य ज्योतीताई पाटील यांच्या फंडातुन अर्ध्या किलोमीटर च्या आसपास रस्ता डांबरीकरण झालेला आहे. इतर तीन ते चार किलोमीटर रस्ता अत्यंत खराब आहे. सदरच्या रस्ताचे डांबरीकरण माळशिरस तालुक्याचे आ. रामभाऊ सातपुते यांनी करुन द्यावे अशी मागणी कुसमोडकर ग्रामस्थांची आहे.

# दावा प्रलंबित असताना व्यवहार केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

दिवाणी न्यायालयात जागे बाबतचा दावा प्रलंबित असतानाही जागेचा व्यवहार केला. शिवाय बदल्यात इसारा पोटी घेतलेले २५ लाख रुपये परत न देता फसवणूक केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत राजेश सिद्रामप्पा पाटील (वय ४७, रा. सुदीप कॉम्पलेक्स, होटगी रोड) यांनी सदर बाझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पाटील हे जागेच्या शोधात होते. तेव्हा आरोपी सुभाष रंगनाथ लोहार याची शिवाजी नगर बाळे येथे जागा असल्याची माहिती पाटील यांना कळाली. त्यानुसार डिसेंबर २०२२ मध्ये बैठकीच्या वेळी दोघांमध्ये त्या जागेचा व्यवहार १२ कोटी रुपयांमध्ये ठरला. यामुळे इसारा पोटी पाटील यांनी एक लाख रूपये रोख व २४ लाख रुपये चेक व्दारे आरोपी लोहार यांना दिले. दरम्यान, त्या जागेबाबत आरोपी सुभाष व त्यांचे बंधू यांच्यात वाद सुरू असून त्या संदर्भात सोलापूर दिवाणी कोर्टात वाद सुरू असल्याचे फिर्यादी यांना कळाले. ही बाब आरोपींनी फिर्यादीपासुन लपवली. शिवाय पैसे परत केले नाही. आरोपी सुभाष लोहार, भुषण सुभाष लोहार, रत्नकुमार सुभाष लोहार ( रा. सोलापूर ) यांच्यावर गुन्हा दाखल झाला. घटनेचा तपास हवालदार आटुळे करत आहेत.

**अपघातात दुचाकी चालक बेशुद्ध**

येडशी ते करमाळा असा दुचाकीवरून प्रवास करताना वाटेत कुत्रा आडवा आल्याने घसरुन झालेल्या अपघातात अमरनाथ प्रेमनाथ जाधव (वय ३५ रा. पानगाव ता .कळंब ) हा तरुण गंभीर जखमी झाला . ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास शेलगाव पाटी जवळ घडली. ते करमाळा येने दुचाकीवरून प्रवास करीत होते . कुत्रा आडवा आल्याने ते गंभीर जखमी झाले . त्यांना उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# गायीच्या दुधाला ४० रुपये प्रती लिटर दर द्यावा

## डॉ. बाबासाहेब देशमुख यांची मागणी

सुराज्य/सांगोला

सरकारने लवकरात लवकर नियमांच्या जोखडातून दुध व्यवसायीकांना बाहेर काढुन खर्चाच्या आधारावर गायीच्या दुधाला ४० रुपये प्रती लिटर दर द्यावा. व तुमच्या फॅटचा ... कमीशन कमी करण्याचा जो प्रकार आहे तो ताबडतोब बंद करावा, येणाऱ्या काळात दुध दरवाढीसाठी शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना व पशुपालकांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिला.



दुधाचे दर कमी झाल्याने शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेच्या वतीने पशुपालक शेतकरी यांच्या न्याय हक्कासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. राज्यांमध्ये सुध्दा अनेक संघटनांनी दूध दरवाढीसाठी वेगवेगळ्या भागांमध्ये आंदोलने केली. त्याची दखल घेऊन राज्य सरकारने दुधदरवाढ व करण्यासाठी एक समिती गठीत केली. व त्या समितीचा अहवाल आला असेल म्हणूनच राज्यसरकारने दुधाचे दर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. दुध दरवाढ होणार म्हटल्यावर पशुपालक शेतकरी आनंदात होता परंतु ही दुध दर वाढ फसवी असल्याने सर्वांच्या आनंदावर पाणी फिरले आहे... सध्या ३.५/८.५ फॅट असलेल्या दुधाला ३२ रुपये दर मिळत आहे.. तो दर वाढवुन ३४/-रुपये करण्यात आला आहे... परंतु खरी मेख तर पुढे आहे.. एकतर १ पॉईंट फॅट कमीलागली तर २० पैसे कमी व्हायचे म्हणजे लिटरला १/- रुपया कमी व्हायचा आता नवीनच शक्कल लढवली आहे.. १ पॉईंट फॅट कमी लागली तर १ रुपया कमी होणार आहे. म्हणजे लिटरला ५ रुपये कमी होणार आहेत. तसेच वाहतुक व कमिशन २ रुपये होते ते १५० पैसे कमी करण्यात आले आहे. एकतर पावसाच्या लहरी पणामुळे पिके नाहीशी झाली आहेत... कसाबसा शेतकरी दुध व्यवसायाकडे वळाला असताना पुन्हा दुधाची दर वाढ नियोजन पध्दतीने रोखुन पशुपालक शेतकर्यांना आर्थिक अडचणीत आणण्याचे काम सरकारने केल्याचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले

# राज्य योगासन निवड चाचणी आणि जिल्हा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर डिस्ट्रिक्ट योगासन स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित राज्य योगासन निवड चाचणी आणि जिल्हा स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. खोखो चे राष्ट्रीय मार्गदर्शक आणि पंढरपूर तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

९ ते १६ जुलै दरम्यान राज्य योगासन निवड चाचणी व जिल्हा स्पर्धा कुमठा नाका येथील क्रीडाधिकारी कार्यालय आवारात झाल्या. विद्यार्थी, विद्यार्थिनी, पुरुष, महिला अशा प्रत्येकी तीन याप्रमाणे एकूण १२ वयोगटात या स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेतील विजेत्यांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली. विविध वयोगटातील जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पुढीलप्रमाणे - सब ज्युनिअर गर्ल्स ट्रॅडिशनल - अमृता गुंफेकर, नयन देशपांडे, खुशी बाबा. आर्टिस्टिक सिंगल- तेजस्विनी मादगुंडी, नयन देशपांडे, संहिता गद्रे. आर्टिस्टिक पेयर - अमृता गुंफेकर व तेजस्विनी मादगुंडी, कार्तिकी भोजने व ज्ञानेश्वरी स्वामी, गौरी मोरे व तनया मोरे. रीदमिक पेअर - खुशी बाबा व ईश्वरी महाडिक, स्वराली शिंगाडे व अनिका पाटील, श्रेया राजमाने व ईश्वरी गोडे. सब ज्युनिअर बॉईज ट्रॅडिशनल - गौरव चव्हाण, वेदांत गाडे, हर्ष चव्हाण. आर्टिस्टिक सिंगल - गौरव चव्हाण, कन्हैया लांडे, प्रसाद दिवसे. आर्टिस्टिक पेअर - ओम तुलशेट्टी व सिद्धांत बाळी, श्रेयश स्वामी व वेदांत गाडे, कन्हैया लांडे व पृथ्वीराज चव्हाण. रिदामिक पेयर - शिवम स्वामी व खुशाल सिंग, ओम तुळशेट्टी व सिद्धांत बाळी. ज्युनियर गर्ल्स ट्रॅडिशनल - अमृता सरगुळे, प्राची डावरे, संस्कृती डोरले. स्पर्धा समन्वयक स्पर्धा प्रमुख व मुख्य पंच म्हणून नॅशनल गेम्स व खेलो इंडिया पंच स्नेहल पेंडसे यांनी काम पाहिले. तर पंच म्हणून राजश्री तवकरी, स्नेहा पांडव, मनीषा हत्याळीकर, पल्लवी स्वामी, अनुजा जोशी, आरती गोरटे, स्वाती कुरनुरकर, रोहन घाडगे, संतोष दुधाळ, सागर शिरसकर, राजेंद्र अनवते, अक्षया पेंडसे, सारा थोबडे, भावना गुंफेकर, सारिका घाडगे, मंजिरी गुरुजी, रोहिणी उपळाईकर, सागर शिरसकर, राजेश्वरी उपाध्ये, सरस्वती कालाणी यांनी काम पाहिले. यात सोलापूर, करकंब, मंगळवेढा येथील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

# खा. डॉ. महास्वामींच्या जात पडताळणीची २८ पासून पुन्हा सुनावणी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रावर पुन्हा एकदा सुनावणी होणार आहे. उच्च न्यायालयाची ऑर्डर सोलापूर पडताळणी समितीला मिळाली आहे. २८ जुलैला समितीचे सदस्य खासदारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या फेर पडताळणीची कार्यवाही सुरु करणार आहेत.



लोकसभा निवडणुकीत खासदारांनी बनावट जात प्रमाणपत्र जोडल्याची तक्रार प्रमोद गायकवाड यांनी जात पडताळणी समितीकडे केली होती. त्यानंतर समितीने दक्षता पथक नेमून खासदारांच्या मूळ गावापासून प्रमाणपत्र दिलेल्या तहसील कार्यालयापर्यंतची सर्व कागदपत्रे पडताळून पाहिली. सुनावणीअंती प्रमाणपत्र बनावट असल्याचा निकाल समितीने दिला होता. त्यानंतर जिल्हा न्यायालयाच्या निकालानुसार अक्कलकोट तहसीलदारांच्या माध्यमातून खासदार डॉ. महास्वामींविरूद्ध कलम ४२०'अंतर्गत गुन्हा देखील दाखल झाला. त्यावर डॉ. महास्वामींनी उच्च न्यायालयात धाव घेतली. काही दिवसांपूर्वी त्यावर उच्च न्यायालयाने निकाल देत या जात पडताळणी प्रकरणी फेर तपासणी करून समितीने निकाल द्यावा, असे आदेश दिले. त्यानुसार आता जात पडताळणी समितीचे कामकाज सुरु झाले आहे. त्यामुळे आता खासदारांना पुन्हा त्यासंदर्भातील सुनावणीला सामोरे जावे लागणार आहे.

# पोलिसांना खबर दिली म्हणून डोळ्यात चटणी टाकून मारहाण

सुराज्य/सोलापूर

सोलापूर पोलिसांना खबर का देतो या कारणावरून डोळ्यात चटणी टाकून लाथाबुक्क्याने मारहाण केल्याची घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास रिमांड होम जवळ घडली. दीपक राजेंद्र माशाळ वय उपस्थित राहणार दत्तनगर पाथरूड चौक असे जखमीचे नाव आहे तो काल रात्री दहा वाजेच्या सुमारास रिमांड होऊन पायी निघाला होता त्यावेळी अनोळखी त्याला आमचा विरुद्ध पोलिसात खबर देतो का असे म्हणत डोळ्यात चटणी टाकून मारहाण केली अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे

**असभ्य वर्तन करीत महिलेस मारहाण : तिघाविरुद्ध गुन्हा दाखल**

शिवीगाळ केल्याच्या कारणावरून एका महिलेशी असभ्य वर्तन करीत तिला काठीने मारहाण करून जखमी करण्यात आले . ही घटना माढा तालुका परिसरात घडली. या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी लखन शहाजी सरवदे, किरण ज्योतीराम वजाळे आणि पप्पू मोतीराम वजाळे (सर्व रा.अंबड ता . माढा) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. ती महिला घराजवळ काम करत होती. त्यावेळी वरील ठिकाणी आम्हाला शिवीगाळ का करते ? असे म्हणत तिच्याशी असावे वर्तन करीत मारहाण केली. आणि त्यांच्या गळ्यातील दीड ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र किरण वजाळे याने हिसकावून घेतले . अशी नोंद पोलिसात झाली .





**हॉटेल कामगारास केबलने मारहाण**

पैशाच्या वादावरून हॉटेल मालकाने केबल वायरने केलेल्या मारहाणीत राजेंद्र दिनकर माने (वय ६० रा .अनगर ता.मोहोळ ) हे जखमी झाले .ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास अरणगाव येथील अजिंक्य ढाबा येथे घडली . त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात कांता (पत्नी) यांनी दाखल केले. त्याला पैशाच्या कारणावरून हॉटेलचे मालक भारत शिवाजी पवार याने मारहाण केली . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

# सिंहगडच्या विद्यार्थ्यांनी बनवली दुहेरी अक्ष सौर ट्रॅकिंग प्रणाली

सुराज्य/सोलापूर

केगाव येथील एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल विभागातील विद्यार्थ्यांनी 'दुहेरी अक्ष सौर ट्रॅकिंग' प्रणाली बनवली आहे. यामध्ये हवामान निरक्षण क्षमतासह एकत्रित सौरऊर्जा आहे. यामध्ये ऊर्जेचा स्वच्छ आणि नूतनीकरण स्त्रोतामुळे सौर ट्रॅकिंग सिस्टीमची कार्यक्षमता सुधारत आहे.



सौर पॅनल दिवसभर सूर्याच्या स्थितीत करून संरेखित करून सौर पॅनेलची हवेतील पर्यावरिणिय घटकांमुळे कार्यक्षमता आणि सुरक्षितता हवामान परस्थितीचा आढावा घेऊ शकतो. दुहेरी अक्ष सौर ट्रॅकिंग विकसीत करण्यावर भर दिला असून क्षेतीज आणि उभ्या दोन्ही समतलांमध्ये सौर पॅनेलची असणारी प्रणाली आहे. सूर्याच्या हालचालींचा मागोवा घेऊन सौरउर्जेपासून जास्तीत जास्त रेडिएशन शोषणे, त्यावर परिणामी करणारी ऊर्जा निर्मिती वाढते. यामध्ये वातावरणीय परिस्थितीवर रिअल टाइम डेटा गोळा करण्यासाठी हवामान निरक्षण सेन्सर, जसे तापमान, आद्रता, वाऱ्याचा वेग आणि पर्जन्य पातळी इत्यादी पॅरामीटर्स मोजले जातात आणि त्याचे विश्लेषण केले जाते. हा डेटा सौर पॅनेलच्या कार्यक्षमतेवर हवामानाच्या प्रभावांचे मूल्यांकन केले जाते. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी संमित पाटील, समर्थ पाटील, सुप्रिया वावरे या विद्यार्थांनी परिश्रम घेतले व प्रा.माणिक शिंदे यांनी या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ.शंकर नवले, उपप्राचार्य डॉ.रविंद्र व्यवहारे व डॉ. शेखर जगदे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागप्रमुख प्रा.विजय कुमार बिरादार, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# गारपीट व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई लवकर मिळावी

## आ. रणजितसिंहांची विधानपरिषदेत मागणी

सुराज्य/अकलूज

मार्च, एप्रिल व मे २०२३ या महिन्यांच्या कालावधीत वादळीवारे, गारपीट, अवकाळी पावसाने राज्यासहित सोलापूर जिल्ह्याला झोडपले होते. राज्यातील शेतकऱ्यांच्या १ लाख ९९ हजार ४८६ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले होते तर सोलापूर जिल्ह्यात ३७८५ हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने शासनाकडे पाठवली होती. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ताबडतोब आर्थिक मोबदला मिळावा या संदर्भात आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानपरिषदेत सरकारकडे मागणी केली. मार्च, एप्रिल व मे २०२३ या कालावधीत झालेल्या वादळीवारे, अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या सोलापूर जिल्ह्यात करमाळा, माढा, माळशिरस, अक्कलकोट, पंढरपूरसह काही तालुक्यात मयत व्यक्ती ३, मयत जनावरे ६२ अंशत: घर पडझड ३९२, नष्ट झालेल्या झोपड्या २० जनावरांच्या गोठा ६ व शेतीपिकांचे बाधित ३७८५ हेक्टर असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने संकलित केली होती.



त्यानुसार ७७०१४६८०/- रुपयांचे अनुदान शासन स्तरावर प्रस्तावित होते. सद्यस्थितीत ग्रामीण भागात पावसाने दडी मारलेली आहे. बहुतांश ठिकाणी पेरण्या खोळंबल्या आहेत, काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकट आहे, अशा परिस्थितीत अवकाळी पावसामुळे व वादळी वाऱ्यामुळे कडधान्य, फळपिके व भाजीपाला इ. पिकांचे व मालमत्तांचे नुकसान झाले. गारपीटीमुळे विविध भागातील जनावरे दगावणे, पावसामुळे शेत जमिनीची प्रचंड धूप होऊन बांध बंदिस्ती अनेक ठिकाणी वाहून गेल्याचे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले.

# अक्कलकोट बसस्थानकाची अवस्था दयनीय ‘स्वच्छ सुंदर तीर्थक्षेत्र’ संकल्पनेला जातोय तडा

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट तीर्थक्षेत्रातील बसस्थानकाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. अक्कलकोट बसस्थानकावर पाऊल ठेवताच प्रवाशी स्वामी भक्त यांना खड्डे चिखल साचलेले पाणी रस्त्यावरच सोडलेले सांड पाणी दुर्गंधी पिण्याच्या पाण्याचा अभाव या समस्याचेच दर्शन होत आहे. यामुळे ‘स्वच्छ सुंदर तीर्थ क्षेत्र अक्कलकोट’ संकल्पनेला तडा जात असून अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत.**

अक्कलकोटहून कर्नाटकातील श्रीदत्त स्थान गाणगापूरकडे जाता येते. मराठवाड्यातील तुळजापूर आई भवानी मातेच्या दर्शनासाठी जाता येते. शनिवारी गौडगाव मारुती व हैद्रा देवस्थान दर्शनार्थ अमावस्याला प्रवाशी भाविकांची मोठी गर्दी असते. गुरुवारी, रविवारी पौर्णिमेला स्वामी दर्शनार्थ प्रवाशी भाविकांची मोठी गर्दी असते. यामुळे अक्कलकोट बसस्थानकावरुन मोठ्या प्रमाणात प्रवाश्यांची वर्दळ आहे. मोठ्या प्रमाणातील प्रवाशाची अक्कलकोट बसस्थानकावर मोठी वर्दळ असताना पिण्याचे पाण्याची व्यवस्था बसस्थानकावर नाही. नळ जोडणी असूनही ती काही स्वार्थी लोकांनी बंद केली आहे

बसस्थानकाच्या बसथांब्यावरच दुर्गंधीयुक्त सांडपाणी सोडले जाते. काही ठिकाणी शौच टाकीची दुर्गंधी आहे.





हैद्रा स्टेशन, नागणसूर, विजापूर या भागाकडे जाणाऱ्या बसथांब्यासमोर पावसाचे पाणी साचते. प्रवाश्यांना विशेषतः बालके, वृद्ध, महिला, पुरुष यांना बसमध्ये प्रवेश करताना चिखल पाण्यातून मार्गक्रमण करणे त्रासदायक असुरक्षित आहे. बसस्थानकावरील अस्वच्छता दुर्गंधी ड्रेनेज सांडपाणी याचा बंदोबस्त करावा, खड्डे बुजवावे, पाण्याचा योग्य निचरा व्हावा, चिखल दलदल नष्ट करावे, कायम स्वरूपी फिल्टर पिण्याचे शुद्ध पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.



# पिरळे ग्रामपंचायतीच्यावतीने महिलांसाठी शिलाई मशीन प्रशिक्षण

**नातेपुते** : पिरळे तालुका माळशिरस येथे ग्रामपंचायत माझी वसुंधरा अभियान अंतर्गत ग्रामपंचायत पिरळे व द ब्रिलियंट हेल्थ अँन्ड अँग्री संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सखी महिला कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र यांच्या सहकार्याने १५ वा वित्त आयोगातून प्रशिक्षण विभाग किशोरवयीन मुलींना व महिलांना तसेच बचत गटातील महिलांसाठी मोफत बेसिक शिलाई मशीन प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरात ८० महिलांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहभागी महिलांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने महिलांसाठी भव्य रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत ३० महिलांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सोनाली संदीप तोडकर, द्वितीय वर्षा प्रमोद शिंदे, तृतीय क्रमांक ऐश्वर्या रघुनाथ खंडागळे तर उत्तेजनार्थ श्रद्धा खिलारे, पल्लवी माने यांनी पटकावला. यावेळी प्रमोद शिंदे, ग्रामसेवक हनुमंत वगरे, शिक्षक संजय ढवळे, अनिता सूर्यवंशी, सुनील दडस, उमेश खिलारे, प्रताप शिंद आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सरपंच रेश्मा दडस, उपसरपंच अमोल शिंदे, सुनील दडस तंटामुक्त अध्यक्ष संजय पाटील, अनिल वाघमोडे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रशिक्षक धनश्री जमदाडे व महिलांनी परिश्रम घेतले.

# टेंभुर्णी उपजिल्हा रूग्णालयासाठी भूसंपादनाची रक्कम भरणा करण्यास शासनाची मंजुरी

## आ. बबनराव शिंदे यांची माहिती

**सुराज्य/टेंभुर्णी** : माढा मतदारसंघातील मौजे टेंभुर्णी येथील उपजिल्हा रूग्णालयासाठी जमीन भूसंपादनासाठी रू. १ कोटी ४३ लाख ८० हजार ८२१ जलसंपदा विभागाकडे भरणा करणेस पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान ग्रामविकास मंत्री ना. गिरिष महाजन यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती आ. बबनराव शिंदे यांनी दिली.

आ. शिंदे म्हणाले की, ‘माढा मतदारसंघातील मौजे टेंभुर्णी हे मोठ्या लोकसंख्खचे गाव आहे. तसेच टेंभुर्णी हे गाव राष्ट्रीय महामार्गावर असून या ठिकाणी एमआयडीसी कार्यान्वित आहे. तसेच परिसरातील अनेक गावांचा टेंभुर्णी या गावाशी मोठा संपर्क आहे. सध्या टेंभुर्णी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे. टेंभुर्णी व परिसरातील



गावातील लोकसंख्येचा विचार करता नागरिक व अपघातग्रस्तांना प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत वैद्यकीय सुख-सुविधा पुरविण्यास अनेक अडचणी येत आहेत. परिसरातील नागरिकांना व राष्ट्रीय महामार्गावरील अपघातग्रस्तांना वेळेत वैद्यकीय सेवा उपलब्ध होणे गरजेचे असल्याने वैद्यकीय येथे ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय होण्यासाठी आ. बबनराव शिंदे यांनी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा सुरू होता. या ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालयासाठी शासनाने विशेष खास बाब म्हणून मंजुरी दिलेली आहे.

उपजिल्हा रूग्णालयाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पुरेशी जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे टेंभूर्णी येथील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (जलसंपदा विभाग) यांचेकडील गट नं. ८६६ मधील १.६० हेक्टर जागा उपजिल्हा रूग्णालयासाठी शासनाने मंजूर केलेली आहे. या जागेचे शासकीय मूल्यांकन १ कोटी ४३ लाख ८० हजार ८२१ एवढे आहे. ही रक्कम उपजिल्हा रूग्णालयाचे भूसंपादनासाठी जलसंपदा विभागाकडे भरणा करणेस पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान ग्रामविकास मंत्री ना. गिरिष महाजन यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती आ. बबनराव शिंदे यांनी दिली.

# अधिक मासानिमित्त कोंडी येथे हरिनाम सप्ताह

**सुराज्य/सोलापूर** : अधिक मासानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही कोंडी येथे हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारपासून या कार्यक्रमास सुरुवात झाली. गावातील मारुती मंदिरासमोर भव्य मंडप उभा करण्यात आला आहे. शुक्रवारी पहिल्या दिवशी हभप जयेश भाग्यवंत महाराज यांचे हरिकिर्तन, शनिवारी विश्वब्रह्म तुकाराम महाराज यांचे वंशज चैतन्य महाराज देहूकर यांची कीर्तन, रविवारी उमेश दशरस्ते, सोमवारी आळंदी येथील छोटे माऊली महाराज, मंगळवारी अनिल महाराज पाटील बाभळगावकर, बुधवारी भाषाप्रभू जगन्नाथ पाटील, कल्याण तर शेवटची कीर्तनसेवा माणकोजी बोधले महाराज यांचे वंशज जयवंत बोधले महाराज यांची होणार आहे. दररोज संध्याकाळी चार ते सहा- संत कथा ऐकवल्या जात आहेत. दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आव्हान कोंडी ग्रामस्थांनी केले आहे.



# उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

**उत्तर सोलापूर** : तालुक्यातील अतिवृष्टी निधीतून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ निधी मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना उत्तर तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्यावतीने तालुका प्रमुख संजय पौळ यांनी जिल्हा अधिकारी निवेदन देत मागणी केली आहे. सन २२-२३ मध्ये अतिवृष्टीत नुकसान झालेल्या वंचित शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई रक्कम खात्यात वर्ग करण्यात यावी, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर रक्कम ५ हजार खात्यात जमा करण्यात आलेली नसून ती शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी. जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाकडे लवकरात लवकर पाठपुरावा करावा. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख संजय पौळ, अच्युतराव बाभळे सरकार, सदाशिव सलगर, सिध्देश्वर गरड, ज्येष्ठ दादासाहेब काशीद, महेश भोसले, प्रशांत चव्हाण यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# भरमसाठ व्याज आकारणी करणारे दोन सावकार ताब्यात

सुराज्य/सांगोला

खाजगी सावकाराद्वारे व्याजाने रक्कम देऊन त्याबदल्यात भरमसाठ व्याज आकारणी करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. शहरातील पीडित दोघांच्या प्राप्त तक्रारींची दखल घेऊन सहायक निबंधक यांच्या पथकाने सांगोला शहरातील घरावर अचानक धाड टाकली.

खासगी सावकारीसाठी वापरले जाणारे चार रजिस्टर, १८ कोरे चेक, तीन कोरे बॉण्डसह कागदपत्रे जप्त केली तर इतर व्यक्तींच्या घरावर टाकून त्यांचीही चौकशी सुरू आहे. ही कारवाई शुक्रवारी बसस्थानकाशेजारील गौरव चांडोले, राधा चांडोले यांच्या घरावर केली. सांगोला येथील गौरव सुनील चांडोले व राधा सुनील चांडोलेसह इतर हे व्याजाने पैसे देऊन त्या बदल्यात भरमसाठ व्याज आकारणी करतात. पैसे परत न आल्यास चेक बाउन्स करून कोर्टात केस दाखल केल्याबाबत रोहित बबनराव पाटील व आनंद दत्तात्रय दौंडे (दोघेही रा. सांगोला) यांची सांगोला सहायक निबंधक सहकारी संस्थेकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. दोघांच्या तक्रारींची दखल घेऊन सहायक निबंधक प्रकाश नालवार यांच्या पथकाने गौरव चांडोले व राधा चांडोले यांच्या राहव्या घरावर व इतर दोन सावकारांवर अचानक धाड टाकून ही कारवाई केली.

# शाळेला शिक्षकच नाही; सरपंच बनल्या शिक्षिका

सुराज्य/मंगळवेढा

तालुक्यातील सलगर खु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असताना शिक्षण खाते या शिक्षक मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे चक्क सरपंचाला शिक्षकाची भूमिका वटवावी लागली.

सलगर खु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते चौथी इतके वर्ग असून या वर्गामध्ये जवळपास ७० विद्यार्थी शिकत असून, चार शिक्षकांच्या आवश्यकता असताना एक शिक्षक या ठिकाणी कार्यरत आहेत. जून



महिन्यापासून या ठिकाणी शिक्षक द्यावा, अशी मागणी येथील महिला सरपंच आरती कांबळे यांनी केली. परंतु शिक्षण खात्याने या मागणीकडे सोयीस्कररित्या दुर्लक्षित केले. आ. समाधान आवताडे यांच्या गाव भेट दौऱ्यात आपल्यावर अंगलट येऊ नये या दृष्टीने शिक्षण खात्याने फक्त गावभेट दौऱ्याच्या दिवशी एक शिक्षक तात्पुरते स्वरूपात या शाळेवर पाठवण्यात आला. मात्र, दुसऱ्या दिवशी तो ही शिक्षक आला नाही. त्यामुळे तीन शिक्षकांशी गरज असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सरपंचाला आता शिकवण्याची जबाबदारी पार पाडण्याची दुर्दैवी वेळ आली आहे.

पहिली ते चौथीपर्यंत एकच शिक्षक असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक होणारी नुकसान बघवेना म्हणून गेले दहा दिवसापासून लोकांनी मला विकासाच्या दृष्टीने सरपंच केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील भवितव्याचा विचार करून मी स्वतः शिकवण्याचे काम करीत आहे, असे सरपंच आरती कांबळे यांनी सांगितले.

# मोहोळ येथे आज आंबा कार्यशाळा

**मोहोळ** : मोहोळ येथील यादूळे मंगल कार्यालय येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा सोलापूर व महादेश फार्मर प्रोडूसर कंपनी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २३ जुलै सकाळी ११.०० वा सघन आंबा लागवड, वर्षभर घ्यावयाची काळजी, पाणी व्यवस्थापन आदी विषयावर आंबा कार्यशाळा आयोजित केली आहे. तरी शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मोहोळ तालुका कृषी विभाग व महादेश फार्मर प्रोड्युसर कंपनीच्यावतीने करण्यात आले आहे.

# भवानी घाट रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु

## शिंगणापूर-नातेपुते मार्गावरील एसटी बस पर्यायी मार्गाने धावणार

सुराज्य/नातेपुते

शिखर शिंगणापूर भवानी घाट रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे शिंगणापूर- नातेपुते मार्गावरील भवानी घाटातील वाहतूक बंद करण्यात आली असून नातेपुतेकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. त्यामुळे शिंगणापूरहून नातेपुतेकडे जाणाऱ्या सर्व एसटी बसेस कोथळे घाटातून धावणार असल्याची माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.

डाळज-कराड राज्यमार्ग अंतर्गत नातेपुते मार्गावरील घाटरस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने घाटातील वाहतूक बंद ठेवून शिंगणापूर-नातेपुते मार्गावरील वाहतूक कोथळे, पिंपरी या पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश सोलापूर जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. त्यामुळे दहिवडी-शिंगणापूर-





नातेपुते मार्गावरून येणाऱ्या- जाणाऱ्या सर्व एसटी बसेस २० जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीसाठी पर्यायी मार्ग असलेल्या कोथळे घाट, पिंपरी यामार्गाने धावणार आहेत. शिंगणापूर ते नातेपुते जाण्यासाठी पर्यायी मार्गाने ११.६ किलोमीटर अंतर वाढणार असून एसटीच्या तिकिट दरात २ टप्प्याची (स्टेज) वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना २० रुपये जादा तिकिट आकारले जाणार आहे. परंतु पासधारक विद्यार्थ्यांकडून कोणतेही जादा तिकिट आकारले जाणार नाही. तसेच दहिवडी आगाराच्या दहिवडी-नातेपुते मार्गावरील सर्व फेऱ्या आजपासून नियमितपणे पर्यायी मार्गाने धावणार असून पर्यायी मार्गाने वाहतुकीबाबत अकलूज, इंदापूर, करमाळा, आटपाडी, मुखेड आगारांना कळविण्यात आल्याची माहिती दहिवडी आगार व्यवस्थापक विक्रम हांडे यांनी दिली आहे.

# सांगोल्यातील व्यापारी संकुलासाठी १० कोटी मंजूर : आ. पाटील

सुराज्य/सांगोला

सांगोला नगरपरिषद हद्दीत आरक्षण क्रमांक ३१ त्रिमूर्ती टॉकीजसमोर व्यापारी संकुल बांधणे या कामासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडून वैशिष्ट्य पूर्ण योजनेअंतर्गत दहा कोटी रुपये निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली. चालू पावसाळी अधिवेशनामध्ये मागणी केल्याप्रमाणे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगोला नगरपरिषदेसाठी १० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे या चालू अधिवेशनातून सार्वजनिक बांधकाम खात्याकडूनही ३५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.



सांगोला मतदार संघासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध झाला असल्याने सांगोला शहरासह ग्रामीण ग्रामीण भागाचा ही विकास होणार आहे. या मंजूर निधीतून सांगोला शहराच्या मध्य. ठिकाणी व्यापारी संकुलाचे बांधकाम होणार असल्याने सांगोला शहराच्या विकासामध्ये अधिकची भर पडणार आहे.

# द्राक्षबागेस नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षणासाठी ‘प्लॅस्टिक कव्हर’ योजना

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात दर्जेदार व निर्यातक्षम द्राक्ष पिकांचे उत्पादन घेण्यासाठी व अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून पिकाचे संरक्षण व्हावे यासाठी कृषी विभागामार्फत प्लॅस्टिक कव्हर योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेच्या अनुदानासाठी फलोत्पादन या घटकाखाली http://mahadbt.maharashtra.gov.in या ऑनलाइन पोर्टलवर शेतकऱ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

यासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, भागीदार संस्था व फार्मर प्रोड्यूसर कंपनी यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. योजनेच्या लाभासाठी अर्जदार शेतकरी व संस्था व कंपनी यांना द्राक्षबागेच्या नोंदीसह ७/१२ उतारा, ८ अ उतारा,





आधार कार्डची छायांकित प्रत, आधार संलग्न बँक खात्याच्या पुस्तिकेची प्रथम पानाची छायांकित प्रत, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकरी असल्यास जात प्रमाणपत्र, विहित नमुन्यातील हमीपत्र, बंधपत्र तसेच चतु:सीमा नकाशा इत्यादी कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत.स्वत:च्या मालकीची जमीन असणारे शेतकरी, तसेच दीर्घ मुदतीचा किमान १५ वर्षे व दुय्यम निबंधकांकडे नोंदणीकृत भाडेकरार या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे. जिल्ह्यास दिलेल्या लक्ष्यांकाच्या मर्यादेत लाभार्थी निवडीसाठी प्राधान्य देण्यात येणार असून, या योजनेसाठी प्रति एकर रुपये ४ लाख ८१ हजार ३४४ इतक्या खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रति लाभार्थी २० गुंठे ते १ एकर दरम्यान लाभ देय आहे. मात्र, अनुदान मर्यादा खर्चाच्या ५० टक्के किंवा प्रति एकर रुपये २ लाख ४० हजार ६७२ इतकी असणार आहे. द्राक्ष पिकासाठी प्लॅस्टिक कव्हर उभारणीसाठी गुणवत्तापूर्ण साहित्य पुरवठा करण्यासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांना बीआयएस मानांकनानुसार तांत्रिक निकषाची पुर्तता करून साहित्याचा पुरवठा करणाऱ्या उत्पादक कंपन्या व पुरवठादार यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

### युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्याचा उद्देश

या योजनेमुळे शेतकऱ्यांना उच्च प्रतीच्या पिकांच्या उत्पादनासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध होणार असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळणार आहे. राज्यातील द्राक्ष पिकांना केवळ नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे इतकाच या योजनेचा हेतू नसून, ग्रामीण भागातील युवकांना कृषी क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध होण्याचा उद्देशही फलोत्पादन विभागाने ठेवला आहे.

# कै. ॲड. जाधव यांच्या जयंतीनिमित्त मळोली येथे वक्तृत्व स्पर्धा

सुराज्य/माळशिरस

मळोली तालुका माळशिरस येथे कै. लोकनेते ॲड. जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब नारायण जाधव यांच्या ८५ व्या जयंतीनिमित्त मळोली येथील जनता विद्यालय व ज्यु. कॉलेज मळोली येथे जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



दि. २ ऑगस्ट २०२३ रोजी इयत्ता १ ली ते ४ थी सकाळी १०.०० वाजता स्पर्धा होणार आहेत. प्रथम क्रमांक १,१११ रुपये, दुसरे बक्षीस ७५१ रुपये तिसरे बक्षीस ५५१ रुपये, उत्तेजनार्थ ३३१ रुपये दिले जाणार आहे. तसेच इयत्ता ५ वी ते ७ वी १ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता स्पर्धा होणार आहेत. पहिले बक्षीस २,१११ रुपये, दुसरे बक्षीस १,१११ रुपये, तिसरे बक्षीस ७५१ रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र उत्तेजनार्थ ५५१ रुपये व प्रमाणपत्र. १ ऑगस्ट २०२३ रोजी इयत्ता ८वी ते १०वी मंगळवार सकाळी १०.०० वाजता विविध विषयावर भाषणाचे सादरीकरण केले जाणार आहे. या स्पर्धेसाठी पहिले बक्षीस ३,१११ रुपये, दुसरे बक्षीस २,१११ रुपये तिसरे बक्षीस १,१११ रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ ५५१ रुपये व प्रमाणपत्र. २ ऑगस्ट २०२३ रोजी खुला गट सकाळी १० वाजता होणार आहे. पहिले बक्षिस ५,१११ रुपये, दुसरे बक्षीस ४,१११ रुपये, तिसरे बक्षीस ३,१११ रुपये, चौथे बक्षीस २,१११ रुपये सन्मानचिन्ह. वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्यासाठी शाळांनी तानाजी लवटे ८२७५३०३१५२, अभिजीत जाधव ९८६०५४७६४२, पृथ्वीराज जाधव ९९७५७५५९०१, विजय झुरुळे ९५४५४८६४६४, निलेश जाधव ९८२२२२४८३९ यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धांचा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम गुरुवार ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. तरी या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन शंभुराजे इंग्लिश मीडियम स्कूल मळोली, शिवप्रेमी गणेशोत्सव मंडळ मळोली, रणजीत बापू युवा फाउंडेशन मळोली, जनता विद्यालय व जुनियर कॉलेज मळोली यांनी केले आहे.

# मंदिर उत्सवांचा उपयोग शक्तीप्रदर्शनासाठी करणाऱ्यांना न्यायालयाने फटकारले

सुराज्य/मद्रास

**मद्रास उच्च न्यायालयाने मंदिरांच्या उत्सवांचा उपयोग शक्तीप्रदर्शनासाठी करणाऱ्यांना चांगलंच फटकारलं. शुक्रवारी (२२ जुलै) झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सध्या अनेक मंदिरांच्या उत्सवांचा उपयोग वेगवेगळे गटांच्या शक्तीप्रदर्शनासाठी होत असल्याचं निरिक्षण नोंदवलं. तसेच अशा उत्सवांच्या आयोजनांमध्ये कोठेही भक्ती दिसत नाही, असंही नमूद केलं.**



न्यायालय म्हणाले, 'मंदिरांचा उद्देश भाविकांना शांतता आणि आनंदासाठी देवाची भक्ती करणे हा आहे. मात्र, दुर्दैवाने मंदिर उत्सवात हिंसाचार होत आहे. हे उत्सव त्या भागात कोण अधिक शक्तीशाली आहे हे दाखवण्याचा मंच झाले आहेत. हे उत्सव आयोजन करण्यात कोठेही भक्ती दिसत नाही. यामुळे मंदिर उत्सवांच्या मूळ हेतूचाच पराभव होत आहे.

**हिंसाचार रोखण्यासाठी अशी मंदिरं बंद करणं योग्य ठरेल**

मद्रास उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती आनंद व्यंकटेश यांच्या खंडपीठाने अशा मंदिर उत्सवांचा शेवट दोन गटांमधील हिंसाचारात होतो, असं निरिक्षण नोंदवलं. तसेच यापेक्षा असे हिंसाचार रोखण्यासाठी अशी मंदिरं बंद करणं योग्य ठरेल, असंही नमूद केलं. कोणत्याही व्यक्तीने आपला अहंकार सोडून आशीर्वाद घेण्यासाठी मंदिरात गेलं पाहिजे. तसं झालं नाही, तर मंदिरांचा काहीही उपयोग नाही.

**नेमकं प्रकरण काय आहे?**

एका व्यक्तीने आपण मंदिराचे वंशपरंपरागत विश्वस्त असल्याचा दावा केला आणि दरवर्षी होणाऱ्या मंदिर उत्सवाच्या आयोजनासाठी पोलीस संरक्षणाची मागणी केली. मात्र, राज्य सरकारने न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, हा मंदिर उत्सव कुणी करायचा यावरून दोन गटात वाद सुरू आहे. हा वाद सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर तहसिलदारांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक झाली. मात्र, त्यात तोडगा निघाला नाही.

**महसूल आणि पोलीस विभागाला दैनंदिन अनेक महत्त्वाची कामे**

दोन्ही गटात मंदिर उत्सवानंतर मूर्ती मंदिरात ठेवण्याचा विधी कुणाच्या हस्ते करायचा यावरून वाद आहे. हा वाद चर्चा आणि बैठकांनंतरही न सुटल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून तहसिलदारांनी मूर्ती मंदिरात ठेवण्याचा विधी करण्यापासून दोन्ही गटांना रोखलं. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने महसूल आणि पोलीस विभागाला दैनंदिन अनेक महत्त्वाची कामं करायची असतात. अशा गटांच्या वादात त्यांचा वेळ आणि उर्जा खर्च होत असल्याचं निरिक्षण नोंदवलं. तसेच अशा गटांची अनेकदा देवावर श्रद्धा नसते, त्यांना केवळ आपली शक्ती दाखवायची असते, असंही नमूद केलं.

---

## तांदळाची दरवाढ रोखण्यासाठी केंद्राकडून मोठा निर्णय

सुराज्य/पुणे

बिगरबासमती तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात कर लादूनही निर्यात सुरू राहिल्यामुळे केंद्र सरकारने बिगरबासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. मोसमी पावसाने ओढ दिल्यामुळे भात लागवड रखडली आहे. देशांतर्गत तांदळाची उपलब्धता कायम राहून, दरवाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्राने हे पाऊल उचलले आहे.



मोसमी पावसाने ओढ दिल्यामुळे देशात सरासरीच्या तुलनेत दहा लाख हेक्टरने पेरण्या कमी झाल्या आहेत. मागील वर्षी १४ जुलैपर्यंत ६०७.९८ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या होत्या. यंदा १४ जुलैपर्यंत ५९८.४३ लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. अपुऱ्या पावसाचा भात लागवडीला मोठा फटका बसला आहे. भात लागवड ६.१ टक्क्यांनी घटून १४ जुलैपर्यंत १२३.१८ लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे.

**बिगरबासमती तांदूळ का महत्त्वाचा?**

देशात मागील वर्षी १२३० लाख टन एकूण तांदूळ उत्पादन झाले होते. एकूण निर्यातीमध्ये बिगरबासमती तांदळाचा वाटा सरासरी २५ टक्के असतो. सन २०२०-२१मध्ये ३५,५०० कोटी रुपये किमतीचा १३० लाख टन बिगरबासमती तांदूळ निर्यात झाला होता. सन २०२१-२०२२ मध्ये ४५ हजार कोटी रुपये किमतीचा १७० लाख टन तांदूळ निर्यात झाला होता. सन २०२२-२४मध्ये ३५ हजार कोटी रुपये किमतीचा १२५ लाख टन तांदूळ निर्यात झाला होता. देशातून इंद्रायणी, आंबेमोहोर, सुरती कोलम आदी वाणांचा तांदूळ जगभरात निर्यात होतो.

## महत्त्वाचे वृत्त...



### पुनर्वसन होईपर्यंत तुमच्या पाठीशी : फडणवीस

**मुंबई :** कोयना परिसरात झालेल्या विक्रमी पावसाने सर्वत्र हाहाकार माजवला होता. या प्रलयंकारी पावसाने संपूर्ण परिसराला झोडपून काढले. यात कोयना परिसरातील अनेक डोंगर खचून भुस्खलन झाले. यात डोंगर खचून मिरगाव, ढोकावळे, हुंबरळी या गावांवर कोसळले. १६ व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले. या आपत्तीत मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींचे सांत्वन करण्यासाठी व कोयनानगर येथे स्थलांतरीत केलेल्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी देवेंद्र फडणवीस कोयनानगर येथे आले होते. 'तुम्ही सर्वांनी धीराने रहा, खचून जाऊ नका. आम्ही तुमच्या सोबत आहोत. बाधित गावांचे उत्तम प्रकारे व सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्नशील राहू. पुनर्वसन होईपर्यंत शासकीय निवासस्थाने उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा करू', असे आश्वासन त्यांनी दिले.

### वैतरणा स्थानकातील भुयारी मार्ग पाण्यात बुडाला

**सफाळे :** पश्चिम रेल्वेच्या वैतरणा स्थानकात रेल्वे तिकिट काढल्यानंतर प्रवेश करण्यासाठी असलेल्या एकमेव सबवे (भुयारी) मार्ग हा पावसाळ्यात वारंवार पाण्याने भरत आल्याने प्रवाशांचे बेहद हाल होत असून रेल्वे प्रशासनाने यावर कायमचा तोडगा काढण्याची मागणी येथील प्रवासी वर्गातून होत आहे. भुयारी मार्गाच्या दोन्ही प्रवेशद्वारा समोर रेल्वेने कुठलेही पत्र्याचे शेड बांधलेले नाही. शिवाय पावसाचे पाणी खाली उतरू नये याचा कुठलाही बंदोबस्त केला नसल्यामुळे पावसाचे पाणी पायऱ्यातून थेट सबवे (भुयारी) मार्गात उतरते. त्यातच स्थानक शेजारी असलेल्या डोंगराळ भागातून वाहणारे पाणी डिफसीसीने सबवे मार्गाच्या दिशेने वळवल्यामुळे त्या परिसरात साचणारे पाणी हे सबवे (भुयारी) मार्गात खालून झिरपत असल्याची दाट शक्यता वृतविली जाते.

### 'अतिधोकादायक इमारती खाली कराव्यात'

**मुंबई :** रायगड जिल्हा, खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी या दुर्गम खेडेगावात मध्यरात्रीच्या सुमारास गावकरी साखरझोपेत असताना काही घरांच्या वस्तीवर मोठी दरड कोसळली. त्यात २२ नागरिकांचा बळी गेला. या दुर्घटनेनंतर राज्यातील सर्वच महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद आदींच्या यंत्रणा खडबडून जागृत झाल्या असून त्या यंत्रणा त्यांच्या विभागातील धोकादायक दरड परिसर, धोकादायक इमारती यांची झाडाझडती घेण्यात व्यस्त झाल्या आहेत. मुंबई महापालिका आयुक्त इकबाल चहल यांनीही मुंबईतील अतिधोकादायक असलेल्या ९५ इमारती रहिवाशांनी तातडीने खाली करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे, असे आवाहन केले आहे.

### यवतमाळमध्ये पुराच्या पाण्यात ४५ जण अडकले

**यवतमाळ :** जिल्ह्यात पावसाची जोरदार बॅटींग सुरु आहे. तर यवतमाळ जिल्ह्यात अनेक गावांना पुराने वेढा घातला आहे. जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील आनंदनगर तांडा येथे पुराच्या पाण्यामुळे ४५ लोक अडकले आहेत. अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टरच्या साहाय्याने बाहेर काढण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करत दिली आहे.

### कोल्हापूरला जाण्यासाठी एसटीचा नवा पर्याय

**कोल्हापूर :** पुणे-मुंबई मार्गावर एसटी महामंडळाची अत्यंत सुरक्षित, अत्याधुनिक सेवा-सुविधांनी युक्त असलेली वातानुकूलित शिवनेरी बससेवा सुरू होती. पण, त्या मार्गावर आता ई-शिवनेरी आल्यामुळे त्या बस इतर मार्गावर चालविण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला. मुंबईशिवाय इतर शहरांसाठी या बस जन-शिवनेरी नावाने चालविण्यात येत आहे. प्रायोगिक तत्त्वावर पुणे-नाशिक मार्गावर १० जुलैपासून विनावाहक जन-शिवनेरी सुरू करण्यात आली आहे. अत्यंत माफक दरामध्ये नाशिक-पुणे (शिवाजीनगर) या मार्गावर जन-शिवनेरी धावत असल्यामुळे प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पुणे-नाशिक मार्गावर जनशिवनेरीच्या दिवसभरात त्यांच्या १८ फेऱ्या होत आहेत.

### शॉर्ट कट मारणे भलतेच महागात पडले

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील प्राधिकरणातील मूकबधिर शाळेजवळील मोकळ्या जागेत एक ज्येष्ठ नागरिक व्यक्ती चिखलामध्ये रूतून बसला असल्याची घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. संबंधित व्यक्ती शॉर्ट कट मारून जात होता. मात्र शॉर्ट कट मारणे त्यांना भलतेच महागात पडले आहे. रस्त्यावरून जात असताना तो चिखलात तो रुतून बसला होता. अग्निशमन दलाकडून त्या व्यक्तीची सुखरूप सुटका करण्यात आली. नीळकंठ पाटील असे या बाहेर काढण्यात आलेल्या व्यक्तींचे नाव आहे.

## राज्यात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई, पुण्यासह ६ शहरांना अतिवृष्टीचा अलर्ट**

सुराज्य/मुंबई

गेल्या आठवड्याभरापासून राज्यात तुफान पाऊस झाला. यामुळे सर्वत्र पाणी साचलं असून मुंबईसह अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळालं. अशात आता वीकेंड आला असून अनेकजण फिरण्यासाठी बाहेर पडतात. पण हवामान खात्याकडून सगळ्यांसाठी ही बातमी महत्त्वाची आहे. कारण, राज्यात सर्वत्र सुरू असलेल्या पावसाचा जोर पुढचे दोन दिवस कायम असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पावसाचा अंदाज घेत घराबाहेर पडावं अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात कोकणासह संपूर्ण पश्चिम किनारपट्टीवर मान्सून सक्रिय आहे. यामुळे मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, पालघर आणि घाट भागात आयएमडीकडून अतिवृष्टीचा अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे शक्यतो आठवड्याच्या शेवटी घरीच रहा, अशा सूचना हवामान विभागाकडून देण्यात आल्या आहेत. अशात पुढील तीन ते चार तासांमध्ये मुंबईसह ठाणे, रायगडमध्ये पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आपली काळजी घ्यावी.



दरम्यान, मान्सून महाराष्ट्र राज्यात पुन्हा जोमाने सक्रिय होत आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाट आणि अगदी विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकण आणि पुणे, सातारा, कोल्हापूर आणि नाशिक या भागांतही मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या मुंबई शहर आणि मुंबई उपनगरात मुसळधार पाऊस सुरु झाला आहे. जोरदार पाऊस झाल्यानं सखल भागांत पाणी साचले असून याचा मोठा परिणाम वाहतुकीवर झाला आहे.

## बुलढाणा जिल्ह्यात ढगफुटीसदृश पाऊस; १४० गावांचा संपर्क तुटला

सुराज्य/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात रात्रभर रिमझिम पाऊस बसरल्यानंतर शनिवारी (२२ जुलै) सकाळपासूनच रौद्ररुप धारण केले. सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यात शनिवार सकाळपासूनच ढगफुटी सदृश्य झालेल्या पावसामुळे सर्वच नदी ओढ्यांना पूर आल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तसेच शेतीचे मोठे नुकसान झाले असून काही लोक पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. दोन्ही तालुक्यातील सर्वच नदी नाल्यांना पूर आल्यामुळे अनेक रस्ते बंद पडले असल्यामुळे तब्बल १४० गावांचा संपर्क तुटला असून गावांना पुराच्या पाण्याने वेढा घातला आहे.

तालुक्यातील बावनवीरी नदीला आलेल्या पुरामुळे १०० घरात पाणी शिरले, तर एक शेतकरी पुराच्या पाण्यात वाहून गेला असून अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही.

## 'कोयना' परिसर संवेदनशील; ९ तालुक्यात भूस्खलनाचा धोका

सुराज्य/कोल्हापूर

पश्चिम महाराष्ट्र आणि या भागातील घाटात गेल्या दहा वर्षांत भूस्खलनाचे प्रमाण सतत वाढत आहे. या दशकात केवळ कोयना धरण परिसरातच तब्बल १,८२३ भूस्खलनाच्या नोंदी झाल्या आहेत. २०२१ साली एका वर्षात तब्बल १२३ ठिकाणी ही आपत्ती ओढावली. यावर कायमचा तोडगा काढला जात नाही. दरवर्षी पावसाळ्यात नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात येतात. त्या पलीकडे काहीच होत नसल्याने ही गावे भीतीच्या छायेखाली राहात आहेत.

इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर भूस्खलनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. यापूर्वी माळीणगाव दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने एक सर्वेक्षण केले. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ७६ गावांना भूस्खलनाचा धोका असल्याचा अहवाल देण्यात आला. पण, पश्चिम महाराष्ट्र आणि घाटात हा धोका गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

## 'लालबागचा राजा' धावला इर्शाळवाडीच्या मदतीला

सुराज्य/मुंबई

खालापूर तालुक्यातल्या इर्शाळगडाखाली वसलेल्या इर्शाळवाडीवर मुसळधार पावसामुळे संकटाचा डोंगर कोसळला. एनडीआरएफसह रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबईतील मदत व बचाव पथकांनी वाडीकडे धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. 'लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'नेदेखील इर्शाळवाडीतील नागरिकांना सावरण्यासाठी तातडीने तेथे धाव घेतली. लालबागचा राजा उत्सव मंडळाच्या आपत्कालीन सेवा पथकाने शुक्रवारी सकाळी घटनास्थळी जाऊन गावकऱ्यांना मदतीचा हात दिला. दोन मोठे टेम्पो भरुन मदतीचे साहित्य इर्शाळवाडीत पोहोचविण्यात आले.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लालबागचा राजा मंडळाने आतापर्यंत अनेक आपत्तींमध्ये मदतकार्यात मोलाचा वाटा



उचलला आहे. त्यात प्रामुख्याने रायगडमधील जुई गावात झालेल्या दुर्घटननेनंतर गावाच्या पुनर्वसनासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करावा लागेल. इर्शाळवाडीतील भीषण दुर्घटनेत जखमी झालेल्या आणि यातून वाचलेल्या ग्रामस्थांसाठी लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घटनास्थळी जाऊन मदतकार्यात सहभाग घेतला. शुक्रवारी दिवसभर तेथील नागरिकांना भेटून त्यांचे सांत्वन करून मदतकार्य केल्याचे मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे यांनी सांगितले.

मंडळातर्फे देण्यात आलेल्या मदतीच्या साहित्यामध्ये महिला, पुरुष आणि लहान मुलांचे सर्व अत्यावश्यक कपडे, खाण्यासाठी सुका खाऊ तसेच विविध खाद्यपदार्थ, ग्रामस्थांसाठी तसेच मदतकार्य करणाऱ्या प्रशासनातील सर्व कर्मचाऱ्यांसाठी लागणाऱ्या सर्व जीवनाश्यक वस्तू, पदार्थ यांचा यात समावेश होता.

## पुण्याच्या व्यापाऱ्याची ४६ लाखांची फसवणूक

सुराज्य/पुणे

एका व्यापाऱ्याला त्याचा कांदा परदेशात विकून मोठा नफा कमवून देण्याचं खोटं आमिष दाखवण्यात आलं. व्यापाऱ्याची फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींचा शनिवारी पुणे सत्र न्यायालयाने जमानी अर्ज फेटाळला आहे. परदेशात कांदा विकण्याच्या बहाण्याने मार्केटयार्ड येथील व्यावसायिकाची ४६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पुण्यातल्या मार्केट येथे २०२१ साली घडला होता. या प्रकरणी दोन व्यापाऱ्यांनी अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयात केला होता मात्र तो फेटाळण्यात आलं आहे. सत्र न्यायाधीश आर. आर. मेंढे यांनी हा आदेश दिला. सिद्धप्पा ए. एल. एस. भंडारी आणि गजेंद्र




सिद्धाप्पा (रा. कर्नाटक) असे जामीन फेटाळण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत मार्केटयार्ड परिसरातील कांदा व्यापारी स्वप्नील भगवान बेल्हेकर (वय ३१, रा. दत्तनगर, नऱ्हे) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २०२१ मध्ये हा प्रकार घडला आहे. या घटनेबाबत मिळालेली माहिती अशी आहे की, व्यवसायानिमित्त बेल्हेकर यांची सिद्धाप्पा भंडारी आणि गजेंद्र सिद्धाप्पा यांच्याशी ओळख झाली होती. आम्ही कांद्याचे मोठे व्यापारी आहोत आणि तुमचा माल परदेशात विकून मोठा नफा करून देतो, असे या दोघांनी बेल्हेकर यांना सांगत त्यांचा विश्वास संपादन केला.

## प. बंगालमध्ये मणिपूर घटनेची पुनरावृत्ती

सुराज्य/मणिपूर

मणिपूर येथे महिलांची नग्न अवस्थेत धिंड काढण्यात आली. त्यानंतर या महिलांवर बलात्कार करण्यात आला. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर सर्वच स्तरावरून मणिपूर सरकारवर हल्लाबोल करण्यात आला. मणिपूर सरकार बरखास्त करा अशी मागणी विरोधक करत आहेत. मात्र ही घटना ताजी असतानाच आता पश्चिम बंगालमध्ये २ महिलांना नग्न करून मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चोर समजून दोन महिलांना नग्न करून जमावाने बेदम मारहाण केली. पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यात ही घटना घडल्याचे समजते.

मालदाच्या बामनगोला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाकुआहाट येथे ही घटना घडली आहे. या



ठिकाणी मंगळवारचा बाजार भरतो. या बाजारात पाकिटमारीच्या आरोपावरून दोन महिलांना पकडण्यात आले. त्यानंतर त्यांना बेदम मारहाण करण्यात आली.

मणिपूरनंतर पश्चिम बंगालमध्ये घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण देश हादरून गेला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून संपूर्ण पश्चिम बंगालमध्ये संतापाची लाट उसळील आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणीही करण्यात येत आहे.

## अजितदादा-फडणवीस बर्थ-डेदिवशी एकाच बॅनरवर

# ही दोस्ती तुटायची नाय...

सुराज्य/नागपूर

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरातून या दोन्ही नेत्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दोन्ही नेत्यांचे समर्थक बॅनर आणि पोस्टरच्या माध्यमातून त्यांचे अभिनंदन करत आहेत. नागपूरातील सी.ए.रोड परिसरातही असे एक मोठे बॅनर लावण्यात आले आहे. मात्र, नागपुरात लावलेल्या बॅनरची सर्वत्र चर्चा होत आहे. 'ही दोस्ती तुटायची नाय' अशी हेडिंग देत देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

अजित पवार गटाच्यावतीने नागपुरातील सी.ए. रोडवर हे बॅनर लावण्यात आले आहे. या बॅनरवर 'ही दोस्ती तुटायची नाय' अशी हेडिंग देत २०१९ साली झालेल्या पहाटेच्या शपथविधीच्या वेळीचा फोटोसुध्दा लावण्यात आले आहे. 'राजकारणातील 'दादा' अजितदादा आणि राजकारणातले 'चाणक्य' देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! अशा प्रकारचे बॅनर लावण्यात आले आहे. या बॅनरवर प्रफुल पटेल, दिलीप वळसे पटील, सुनील तटकरे यांच्यासह राष्ट्रवादी काँगेसच्या सर्व मंत्र्यांचे फोटो लावण्यात आले आहेत.

यासोबतच विशेष म्हणजे शरद पवार यांचाही फोटो या बॅनरवर लावण्यात आला आहे. त्यासोबतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही फोटो या बॅनरवरती लावण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँगेस अजित पवार गटाचे प्रवक्ते प्रशांत पवार आणि नागपूर ग्रामीणचे अध्यक्ष बाबा गुजर यांनी राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना अनोख्या पद्धतीने वाढदिवसाचा शुभेच्छा देण्याकरिता हे बॅनर नागपुरातील सी. ए. रोडवरील अग्रसेन चौक मेट्रो स्टेशनजवळ लावण्यात आले आहे.



# पक्ष संघटन वाढवणे, जनतेच्या प्रश्नाला प्राधान्य देणे हाच अजेंडा

## नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांचे प्रतिपादन; सुराज्यला दिली सदिच्छा भेट

सुराज्य/सोलापूर

**काँग्रेसचा ६० वर्षांचा कार्यकाल आणि भाजपचा ९ वर्षांचा कार्यकाळ पाहता भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली जास्त कामे केली आहेत. सोलापूर शहराचा विचार करता समांतर जलवाहिनीचे काम सुरू झाले आहे. लवकरच विमानसेवाही सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या दृष्टीने जे आवश्यक आहे त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या सहकार्याने आपण प्रयत्न करणार आहे. पक्ष संघटन वाढवणे आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नाला प्राधान्य देणे हाच आपला मुख्य अजेंडा असल्याचे भाजपचे नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी सांगितले. काळे यांनी शनिवारी सायंकाळी 'सुराज्य'ला सदिच्छा भेट दिली त्यावेळी ते बोलत होते.**

ते पुढे म्हणाले की, भाजपने यंग ब्रिगेडला प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे. शहराध्यक्ष पदासाठी आपले नाव घोषित झाल्यानंतर विश्वास बसला नाही. तरुण वयात मोठी जबाबदारी कशी स्वीकारणार असा प्रश्न होता. मात्र सर्वांनी धीर दिल्यामुळे आता पक्षाला पुढे नेण्याचा जोमाने प्रयत्न करणार आहे. पक्ष संघटन वाढवणे हाच आपला प्रमुख उद्देश आहे. आतापर्यंत जे पक्षातून गेले त्याबद्दल आपण काहीही बोलणार नाही. मात्र आणखी पक्षातून कोणी जाऊ नये यासाठी आपले प्रयत्न राहणार आहेत. नव्या आणि जुन्या लोकांना घेऊनच आपले कार्य असणार आहे. आगामी महापालिका निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत भाजपचीत सत्ता येणार आहे, असा विश्वासही काळे यांनी यावेळी व्यक्त केला.

चिमणीबद्दल बोलताना काळे म्हणाले की, वास्तविक पाहता चिमणी पाडण्याचा निर्णय न्यायालयाने दिला होता. चिमणी बेकायदेशीर होती, त्यामुळे ती पडणारच होती. विनाकारण त्याचे खापर भाजपवर फोडले जात आहे. चिमणीबाबत राजकारण कोणी केले याचा सखोल विचार करण्याची गरज आहे. चिमणी पाडकामाचा कोणताही परिणाम विधानसभा निवडणुकीवर होणार नाही. अद्याप निवडणुकीला वर्षभराचा कालावधी आहे. तोपर्यंत भाजपचे कार्य, मोदी यांनी सुरू केलेल्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे, असेही काळे म्हणाले. लवकरच शहरातील स्थानिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन या पुढील ध्येयधोरणे ठरवण्यात येतील, असेही काळे म्हणाले. प्रारंभी नरेंद्र काळे यांचे स्वागत व्यवस्थापकीय संपादक रोनीत टोळ्ये यांनी केले.



भारतीय जनता पक्षाचे सोलापूर शहराचे नवे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी शनिवारी सायंकाळी दैनिक सुराज्यच्या कार्यालयालया सदिच्छा भेट दिली. त्यांच्या स्वागताप्रसंगी डावीकडून राम वाकसे, सुराज्यचे व्यवस्थापकीय संपादक रोनीत टोळ्ये, कार्यकारी संपादक शंकर जाधव, सरव्यवस्थापक पुरुषोत्तम मित्रगोत्री

**लवकरच विमानसेवा सुरू होईल :** सोलापुरात विमानसेवा सुरू करण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. आपण माजी शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांच्याशी याबाबतीत बोललो आहे. ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलले आहेत. त्यांच्याकडूनही सकारात्मक प्रतिसाद आहे. त्यामुळे लवकरात लवकर विमानसेवा निश्चितच सुरू होईल असेही काळे बोलताना म्हणाले.

**२०२४ लाही भाजप बहुमताने येणार :** पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्टी ठेवून सर्व नियोजन करत आहेत. आतापर्यंत केलेल्या कामांमुळेच ते आजही ते जनतेमध्ये लोकप्रिय आहेत. आगामी २०२४ च्या निवडणुकीतही भाजप निश्चितच बहुमताने पुन्हा एकदा सत्तेत येईल, असेही काळे म्हणाले.

# बनावट नोटा चलनात आणणाऱ्या चौघांना अटक

सुराज्य/बार्शी

शहरातील तेलगिरणी चौक येथील मिरगणे कॉम्प्लेक्समध्ये बनावट नोटा चलनामध्ये आणणारे तरुण येणार असल्याची माहिती समजताच पोलिसांनी छापा टाकून चौघांना अटक करुन त्यांची तपासणी केली असता शंभर रुपयांच्या २० बनावट नोटा पोलिसांनी पंचासमक्ष जप्त केल्या आहेत. ही घटना मिरगणे क्लॉम्प्लेक्स जवळ घडली. बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जे. आय. पठाण यांनी २५ जुलैपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



सुनिल चंदसेन कोथिंबिरे (वय-२३ मूळ रा. पिंपळगाव नाकले, ता. माजलगाव, जि. बीड, सध्या रा. माळीनगर, अंबाजोगाई, जि. बीड), आदित्य धनंजय सातभाई (वय-२२ मूळ रा. तळोली, ता. परळी, जि. बीड, सध्या रा. स्टेशन लाइन, गांधी मार्केट परळी वैजिनाथ, जि. बीड, कदीर शेख, सुनील वाघमारे (दोघे रा. अंबाजोगाई, ता. बीड) अशी पोलिस कोठडी मिळालेल्या संशयितांची नावे आहेत. दोन इसम बनावट चलनी नोटा घेऊन येत असून मिरगणे कॉम्प्लेक्स येथील गाळ्यामधील व्यापारी यांचेकडे त्या चलनात आणल्या जाणार आहेत, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला होता. पोलिस निरीक्षक संतोष गिरिगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार, हवालदार रेवणनाथ भोंग, श्रीमंत खराडे, रामेश्वर मस्के यांनी शंभर रुपयांच्या बनावट नोटा चलनामध्ये आणण्याचा प्रयत्न करीत असताना चौघांना रंगेहाथ पकडले.

### एका प्लॉटची दोघास विक्री केल्याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा

**सोलापूर :** बाळे येथील एक प्लॉट २०१२ साली एकास विकलेला असताना तोच प्लॉट खोटा लेआउट तयार करून दुसऱ्यास विकून फिर्यादीची व दुय्यम निबंधक कार्यालयाची फसवणूक केल्याप्रकरणी शहरातील प्रख्यात डेव्हलपर्स हरीश मनोहर जानी याच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

विनोद रवींद्र पणीकर (रा.विवेकानंद नगर होटगी रोड,सोलापूर) यांनी जानी डेव्हलपर्स याच्याकडून म हापालिका हद्दीतील बाळे भागातील महात्मा मांगोबा नगर येथील रहिवासी प्रयोजन वसाहती मधील प्लॉट नंबर २३ हा खरेदी खत क्रमांक ४८५२/२०१२ दि.२१ जून २०१२ रोजी ६५ हजार रुपये रोख आणि समर्थ बँकेचे चेक रक्कम ७० असे एकूण १ लाख ३५ हजार रुपये देऊन खरेदी केली होती.त्या प्लॉटच्या कब्जेदार व वहिवाटदार हा फिर्यादी स्वतः असून त्यांनी महापालिकेचे करही भरलेला आहे.असे असताना जॉनी डेव्हलपर यांनी ही प्लॉटची जागा परस्पर खोट्या दस्ताने दुसऱ्यास विक्री केली.तसेच प्लॉट जागेवरील सिमेंटच्या पोल तोडून-मोडून फेकून दिले व जानी यांनी हा प्लॉट वैभव गुळवे यांना विक्री करून फिर्यादीची,दुय्यम निबंधकाची फसवणूक केली आहे.अशी फिर्याद सदर बझार पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून,अधिक तपास पोलीस निरीक्षक डोंगरे हे करत आहेत.

### मारहाण करून खिशातील ३० हजार पळवले; तिघांवर गुन्हा

**सोलापूर :** दारू पिण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून मित्राला मारहाण करून त्याच्या खिशातील ३० हजार रुपये पळविले. ही घटना मंगळवेढा येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी दत्ता खटकाळे, अशोक नागणे आणि औदुंबर नागणे (सर्व रा.डोंगरगाव ता.अक्कलकोट) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात अमोल राजकुमार वेदपाठक (रा.ढवळस ता.मंगळवेढा) याने पोलिसात फिर्याद दाखल केली. तो गुरुवारी दुपारी मंगळवेढा येथील विद्युत मंडळाच्या कार्यालयाजवळ मालकाला पैसे देण्यासाठी थांबला होता. त्यावेळी दुचाकीवरून दत्ता खटकाळे याच्यासह तियेजण तेथे आले. आणि त्याला दारू पिण्यासाठी आम्हाला पैसे दे असे म्हणाले. आपल्या जवळ पैसे नाही म्हणताच त्यांनी त्याला शिवीगाळ केली. आणि जवळच असलेल्या पाटील पंपाजवळ त्याला नेले. त्यानंतर मारहाण करून त्याच्या खिशातील ३० हजार रुपये काढून घेतले . अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार दुधाळ पुढील तपास करीत आहेत .

### संगम येथे टेम्पो चालकास मारहाण करून पैसे लुटले

**सोलापूर :** जनावरांची वाहतूक करणाऱ्या टेम्पो चालकास मारहाण करून त्याच्या खिशातील मोबाईल आणि रोख रक्कम लुटल्याची घटना संगम (ता.माळशिरस) येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. संजय पराडे, रोशन पराडे, सचिन पराडे आणि गणेश इंगळे (सर्व रा.संगम ता. माळशिरस) अशी आरोपींची नावे आहेत. अकलूज येथील असीम जावेद कुरेशी हा आपल्या एमएच४५-एएफ-०२५९ या टेम्पोतून जनावरे घेऊन संगम मार्गे लातूर येथे निघाला होता. त्यावेळी चौघांनी मिळून त्याचा टेम्पो संगम येथे अडवीला. आणि त्याला मारहाण करीत रोकड आणि मोबाईल लुटून नेला. अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत .

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर :** आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी महानंदा बालाजी पिचरुटे (वय-५१,रा. हलगरा,ता.निलंगा.जि.लातूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती देविदास मिरजकर,सासू कांताबाई मिरजकर, नणंद नागमणी कावले,सुनिता कोळी, अनिता चौधरी नंदेचा मुलगा अमोल कावले (रा.विनायक नगर, एमआयडीसी, सोलापूर व उमरगा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ऑगस्ट २०२० ते दि.१२ ऑक्टोंबर २०२१ दरम्यान विनायक नगर व उमरगा येथे वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या मुलीस वेळोवेळी त्रास देत यशोदा देविदास मिरजकर (वय-२७) हिस गळफास घेवून आत्महत्येस प्रवृत्त केले आहे. त्यांनी २० जुलै रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुकडे हे करीत आहेत.

# जिल्हाभरात हातभट्ट्यांवर छापे

## दहा गुन्ह्यात सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाने शनिवारी जिल्हाभरात हातभट्टी दारू ठिकाणांवर राबविलेल्या विशेष मोहिमेत दहा गुन्ह्यात १३८५ लिटर हातभट्टी दारूसह सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संपूर्ण राज्यभरात हातभट्टीमुक्त गाव ही संकल्पना राबविलेली आहे, त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात शनिवारी राबविलेल्या विशेष मोहिमेत जिल्हाभरातील हातभट्टी ठिकाणांवर धाडी टाकण्यात आल्या. मोहिमेत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अ विभाग, ब विभाग, भरारी पथक व सीमा तपासणी नाक्याच्या पथकांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील सेवा तांडा, बक्षीहिप्परगा, दोड्डी तांडा या परिसरात छापे टाकले. दक्षिण सोलापूर तालुक्यात टाकलेल्या छाप्यात सहा गुन्ह्यात एक हजार दोनशे दहा लिटर हातभट्टी दारू व बारा हजार लिटर रसायन असा तीन लाख ४२ हजार ८०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान रेशमा भोजू पवार (वय ३२) या महिलेच्या ताब्यातून रबरी ट्यूब मध्ये ५०० लिटर हातभट्टी दारू व भीमा काशिनाथ राठोड (वय ४२) याच्या राहत्या घरातून ११० लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. इतर आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे. निरीक्षक सदानंद मस्करे यांच्या पथकाने सोलापूर- हैदराबाद रोडवर मुळेगाव तांडा परिसरात विकास शंकर पवार (वय ३७) व सुरेश काशिनाथ राठोड (वय ४०) दोघेही यांना दुचाकीवरून दोन रबरी ट्यूबमध्ये १६० लिटर हातभट्टी दारू वाहतूक करतांना पकडले. त्यांचे ताब्यातून वाहनाच्या किमतीसह ५८ हजार दोनशे रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच निरीक्षक माळशिरस संदीप कदम यांच्या पथकाने चंद्रपुरी (ता. माळशिरस) येथील संजय बुधावले (वय ५५) याच्या ताब्यातून पंधरा लिटर हातभट्टी दारू व ७०० लिटर रसायन जप्त करून जागीच नाश केले. एका अन्य कारवाईत निरीक्षक पंढरपूर किरण बिरादार यांच्या पथकाने लक्ष्मी टाकळी येथे टाकलेल्या छाप्यात चारशे लिटर रसायन जप्त केले. शनिवारी राबवलेल्या विशेष मोहिमेत राज्य उत्पादन शुल्क विभागाने दहा गुन्ह्यात १३८५ लिटर हातभट्टी दारू व तेराशे हजार शंभर लिटर रसायन, एक मोटरसायकल असा चार लाख २८ हजार ८५० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. नागरिकांनी त्यांच्या परिसरात अवैध दारू निर्मिती, विक्री किंवा वाहतूक होत असल्यास या विभागाला संपर्क साधावा, असे आव्हान अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क नितीन धार्मिक यांनी केले आहे.



### यांनी केली कारवाई

ही संपूर्ण कारवाई अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी उपअधीक्षक तथा निरीक्षक सदानंद मस्करे, निरीक्षक संदीप कदम, किरण बिरादार, दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, कृष्णा सुळे, शिवकुमार कांबळे, सुरेश झगडे, मानसी वाघ, सचिन गुठे, रोहिणी गुरव, मयुरा खेत्री, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, गजानन होळकर, जीवन मुंढे, रवी पवार, जवान चेतन व्हनगुंटी, किरण खंदारे, इस्माईल गोडीकट,अशोक माळी, अमित गायकवाड, दशवंत, वसंत राठोड, विजयकुमार शेळके, अनिल पांढरे, योगीराज तोग्गी, प्रशांत इंगोले, तानाजी काळे, प्रकाश सावंत, गणेश रोडे, गजानन जाधव, तानाजी जाधव, वाहनचालक रशीद शेख व रामचंद्र मदने यांच्या पथकाने पार पाडली.

### रिक्षामधून साहित्य पळवले

**सोलापूर :** रिक्षा क्रमांक एमएच.१३.सीटी.२९३५ ही रिक्षा वेंकटेश हॉस्पिटल इंदिरानगर विजापूर रोड येथे लावलेली असताना अज्ञात चोरट्याने त्या रिक्षांमधून रिक्षाची बॅटरी, स्टेफनी,रिक्षातील दोन सीट असे एकूण बारा हजारांचे साहित्य चोरून नेले आहे.ही घटना दि.४ ते ५ जुलाई दरम्यान व्यंकटेश हॉस्पिटल इंदिरानगर येथे घडली. याप्रकरणी विक्रम सिद्राम जाधव (वय-३९,रा.रामवाडी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस नाईक विधाते हे करीत आहेत.

### चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली

**सोलापूर :** घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीए.१८२४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. ही घटना दि.१८ ते १९ दरम्यान साई लॉन्स केगाव येथे घडली.याप्रकरणी स्वप्निल भागवत लोंढे (वय-२५,रा.साई लॉन्स जवळ,केगाव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

# मनिषा आव्हाळे यांनी घेतला सीईओचा पदभार

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषेदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार नूतन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी घेतला.

जिल्हा परिषदेत शनिवारी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रांताधिकारी मनिषा आव्हाळे यांनी कार्यालयात येऊन सिईओ पदाचा भार घेतला. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी सिईओ पदाचा पदभार मनिषा आव्हाळे यांना सुपूर्द केला. या प्रसंगी सिईओ दिलीप स्वामी यांनी नुतन सिईओ मनिषा आव्हाळे यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, अधिक्षक अनिल जगताप, अधिक्षक ए झेड शेख, कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिवानंद मगे, मल्लिकार्जून तलवार यांचे सह ग्रामपंचायत व सामान्य प्रशासन विभागाचे कर्मचारी यांनी स्वागत केले. या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी विविध राबविलेल्या नाविण्यपुर्ण उपक्रमाची माहिती नुतन सिईओ मनिषा आव्हाळे यांना दिली.





### नाविण्यपूर्ण उपक्रमाचे सातत्य राखू

सिईओ दिलीप स्वामी यांनी राबविलेले विविध नाविण्यपुर्ण उपक्रमाचे सातत्य राखू अशी प्रतिक्रिया नूतन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी दिली.

# भुलीचे इंजेक्शन देऊन कत्तलीसाठी नेणाऱ्या जनावरांना जीवदान

सुराज्य/सोलापूर

भुलीचे इंजेक्शन देऊन कत्तलखान्याकडे घेऊन जाणाऱ्या सात जनावरांची बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून सुटका करण्यात आली. ही कारवाई जुना विडी घरकूल येथील बागवान नगरात करण्यात आली.

जुना विडी घरकुल येथील बागवान नगर येथे काही गोवंश तस्करी चोरांनी तब्बल ७ जनावरांना भुलीचे औषध पाजवले. तेथील कुत्रे भुंकू नये यासाठी त्यांना बिस्किटाच्या माध्यमातून बेशुद्ध पडण्याचे औषध देण्यात आले. काही लोकांनी भुल पडलेल्या जनावरांना अलिशान कारगाडीत भरण्यात सुरुवात केली. काही वेळातच तेथील रहिवाशांना काहीतरी चुकीचा प्रकार होत असल्याचे लक्षात आले. त्यांनी बजरंग दलाचे कार्यकर्ते पवनकुमार कोमटी व सतीश सिरसिल्ला यांच्याशी संपर्क साधला. काही क्षणातच बजरंग दलातील बजरंगी घटनास्थळी दाखल झाले. सर्व जनावरांना सुखरूपपणे बार्शी रोड येथील गोशाळेत सोडण्यात आले. ही कारवाई बजरंग दल गोरक्षा विभाग जिल्हाप्रमुख प्रशांत परदेशी, पवनकुमार कोमटी, सतीश सिरसिल्ला, पवन बल्ला, धनंजय बोकडे व इतर कार्यकर्त्यांनी पार पाडली.

# इर्शाळवाडी दुर्घटनेतील अपघातग्रस्तांना बालाजी फाउंडेशनकडून मदत

सुराज्य/सोलापूर

१९ जुलैच्या रात्री रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी ग्रामस्थांवर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेने सर्वांचे मन हेलावून गेले. त्यानिमित्त त्यांना मदतीचा हात देण्यासाठी सोलापुरातील बालाजी अमाईन्स संचालित सामाजिक संस्था बालाजी फाउंडेशनने इर्शाळवाडी ग्रामस्थांप्रती आपली संवेदना जपत ट्रक भरून जीवनोपयोगी साहित्य आणि राशन साहित्य स्थानिक प्रशासनाकडे सुपूर्द केले.



बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक डी. राम रेड्डी म्हणाले की, इर्शाळवाडी येथून येणाऱ्या बातम्यांनी मन अस्वस्थ झाले, तेथील स्थानिक प्रशासनासोबत फोनवर चर्चा करुन अधिक माहिती घेतली आणि ताबडतोब २५ कुटुंबांसाठी जीवनोपयोगी साहित्यांचे किट तयार केले ज्यामध्ये राशन, दैनंदिन लागणाऱ्या भांडी, चादर आणि टॉवेल, रेनकोट, छत्री, औषधे आदी वस्तू ट्रकने रवाना केल्या आहेत. स्थानिक प्रशासनाच्या वतीने रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांनी मदत स्वीकारली आणि बालाजी फाउंडेशनचे आभार मानले या प्रसंगी अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, पोलीस उपायुक्त दीपाली धाटे, बालाजी अमाईन्सचे प्रतिनिधी प्रसाद सांजेकर आणि सचिन मोरे उपस्थित होते.

## चित्रकला स्पर्धेत विद्यार्थी सप्तरंगात रंगले

# चित्रकलेच्या रेषा आयुष्याला दिशा देणाऱ्या ठरतील : दिलीप माने

### स्पर्धेत २९ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

सुराज्य/सोलापूर

प्रत्येकाकडे काही ना काही गुण असतोच फक्त त्या गुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ निर्माण करून दिल्यास त्या कलागुणांना प्रोत्साहन मिळते. चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रेखाटलेली एकापेक्षा एक चित्र, त्यात रंगभरणाची कल्पकता कौतुकास्पद होती. चित्रकलेच्या या रंगी-बेरंगी रेषा विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या ठरतील असे माजी आमदार दिलीप माने यांनी सांगितले.

दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त १२ केंद्र व ९ उपकेंद्रावर आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत २९६७१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. किल्लेदार मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या स्पर्धा उदघाटन कार्यक्रमात माने बोलत होते. विविध केंद्रावर चित्रकला स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सौ. जयश्री माने, सुशीला आबुटे, अरुणा वाकसे, भारत जाधव, सुनिता रोटे, शैलेजा राठोड, नागेश ताकमोगे, बाबा मिस्त्री, नुरुद्दीन मुल्ला, शिवाजी बचुटे, जयकुमार माने, चंद्रकांत लिंबितोटे, तानाजी सिनगारे, अमोल जोशी, सिद्धेश्वर पाटील, संभाजी सावंत, प्रितम कोठारी, संभाजी भडकुंबे, अनिल वाघमारे, शिरीष जाधव, ड. बापू देशमुख, शिवाजी पाटील, नेताजी सुरवसे, बाळासाहेब सुरवसे, अजय सोनटक्के, गोवर्धन जगताप, आदी मान्यवर उपस्थित होते. माजी आमदार दिलीप माने हे विद्यार्थी दशेपासून क्रीडा, कलाक्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या नवनवीन संकल्पनेतून अनेक क्रीडा स्पर्धा भरवल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी गौरव समितीने अतिभव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करून रेकॉर्ड ब्रेक केले. असल्याचे ॲड. बापू देशमुख यांनी सांगितले. शहरी भागात १२ केंद्र व ९ उपकेंद्रात स्पर्धेचे आयोजन, नियोजनाने अनेकांकडून कौतूक, दुबईहून आलेल्या सिद्धी पाटीलचा स्पर्धेत सहभाग, किल्लेदार मंगल कार्यालयात माने यांचे दोन चिमुकल्या मुलींनी केले स्वागत.

